# महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ अन्वये आदेश

दावा क्रमांक ०२/२०१६

जा.क्र.जिउनि/सावकारी/कलम१८/जअंगां/लांझी/१९३३/२०१६
दिनांक ०७/०४/२०१६

वाचा :-

१. श्री. जनार्धन अंबादास गांधिले रा.लांझी ता.गंगापुर जि.औरंगाबाद यांचा अर्ज दि.०२/०९/२०१४
२. या कार्यालयाचे पत्र जा.क्र.जिउनि/सावकारी तक्रार/२७९५/२०१४ दिनांक ०६/०९/२०१४
३. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. गंगापुर यांचा अहवाल दिनांक ११/०१/२०१६
४. श्री. बि.एम नवथर चौकशी अधिकारी यांचा चौकशी अहवाल दिनांक २३/०९/२०१५
५. श्री.जनार्धन अंबादास गांधिले रा.लांझी ता.गंगापुर जि.औरंगाबाद यांचा रू.१०० च्या प्रतिज्ञापत्रासह दाखल अर्ज दिनांक १९/०१/२०१६
६. या कार्यालयाची महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ कारणे दाखवा नोटीस जा.क्र.जिउनि/सावकारी/क १८/३७४/२०१६ दिनांक २१/०१/२०१६
७. सौ.पुष्पाबाई ताराचंद साबळे कलम १८ चे नोटीस ला उत्तर दिनांक ०१/०२/२०१६
८. श्री.जनार्धन अंबादास गांधिले रा. लांझी ता. गंगापुर जि.औरंगाबाद यांचे लेखी म्हणणे दि. १५/०२/२०१६

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD
सत्यमेव जयते
DIST. AURANGABAD

श्री. जनार्धन अंबादास गांधिले
रा.लांझी ता.गंगापुर जि.औरंगाबाद — अर्जदार

**विरूध्द**

सौ.पुष्पाबाई ताराचंद साबळे
रा. शिवराई ता.गंगापुर जि.औरंगाबाद. — गैरअर्जदार

ज्या अर्थी, वाचा क्र. १ अन्वये अर्जदार श्री. जनार्धन अंबादास गांधीले यांनी या कार्यालयात तक्रार अर्ज देऊन त्यात असे नमुद केले की, त्यांची हिरापूर शिवारात गट नंबर ५५ मध्ये शेतजमीन आहे. अर्जदार यांचे वडील श्री.अंबादास महादू गांधीले यांना पैशाची गरज असल्याने त्यांनी शिवराई येथील सावकारी व्यवसाय करणाऱ्या श्रीमती पुष्पाबाई ताराचंद साबळे (ज्यांचा उल्लेख यांपुढे गैरअर्जदार असा केलेले आहे.) यांच्याकडून व्याजाने रू.३००००/- (अक्षरी रूपये तिस हजार मात्र) घेतले होते. गैरअर्जदार यांनी व्याजाने पैसे देण्याच्या वेळी पैशास धर म्हणून अर्जदार यांच्या वडीलांनी शेतजमीनीचे खरेदीखत करून द्यावे लागेल अशी अट घातली तसेच पैसे व्याजासहीत परत केल्या नंतर

खरेदीखत पलटवून देण्यात येईल तो पर्यत शेतजमीनीचा ताबा अर्जदार यांच्या वडीलाकडेच राहील असे सुध्दा सांगीतलेले होते. अर्जदार यांच्या वडीलांना पैशाची गरज असल्याने व त्यांच्या वडीलांचा अडाणीपणाचा फायदा घेऊन विना परवाना सावकारी व्यवसाय करणारे गैरअर्जदार सावकार बाईने खरेदीखताचा कागद करून घेतला आहे.

गैरअर्जदार सावकार श्रीमती पुष्पाबाई ताराचंद साबळे यांनी अर्जदार यांच्या जमिनी शिवाय आसपासच्या खेड्याच्या बऱ्याच गरजू शेतकऱ्यांच्या जमीनीचे अशाच प्रकारे सावकारीने जमीनीचे खरेदीचे कागद करून घेऊन जमीनी बळकवल्या आहे. सदर गैरअर्जदार सावकार बाई यांनी पैसे परत दिल्या नंतर सुध्दा अर्जदार यांची जमीनीचे खरेदीखत रद्द करून दिले नाही. उलट त्यांचे विरूध्द खोटा दावा न्यायालयात दाखल केला. अर्जदार यांचे वडील अडाणी असल्याने त्यांनी कारवाई केली अथवा नाही याची त्यांना माहिती नाही. त्यांचे वडील वारल्या नंतर गैरअर्जदार सावकार यांनी दाखल केलेल्या दाव्या बाबत विचारपूस केली तेव्हा सदर माहिती मिळाली कारण अर्जदार यांचे वडील सर्व व्यवहार पहात होते. अर्जदार यांचे वडील मयत झाल्या नंतर अर्जदार यांनी स्वत: गैरअर्जदार सावकार यांना तुमचे पैसे व्याजासहीत वडीलानी परत दिले आहे. तरी अर्जदार यांच्या जमीनीच्या खरेदीखताचा कागद रद्द करून द्यावा अशी विनंती केली. तेव्हा गैरअर्जदार सावकार यांनी धमक्या दिल्या, जमीन सोडून द्या नसता जिवंत ठेवणार नाही. गैरअर्जदार सावकार सावकारी व्यवसाय करतात व पैशावाल्या आहेत. अर्जदार गरीब असल्याने गैरअर्जदार यांच्या समोर टिकू शकत नाही. तरी सदर विनापरवाना सावकारी व्यवसाय करणाऱ्या गैरअर्जदार सावकार यांच्या जाचातुन मुक्त करून अर्जदार यांची सावकारी व्यवसायात लिहुन घेतलेली जमिन गट न. ५५ क्षेत्रफळ २ एकर जमिनीचे करून घेतलेले दिनांक ३१.१०.२००० रोजीचे खरेदीखत रद्द करून सावकारी पाशातुन मुक्त करावे तसेच गैरअर्जदार यांच्या सावकारी जाचामुळे अर्जदार यांचे वडील मरण पावले व कुटुंबावर संकटाचा डोंगर कोसळला त्यामुळे संपूर्ण कुटुंब मानसिक दडपणाखाली वावरत आहे. त्यामुळे गैरअर्जदारा विरुध्द नियमा प्रमाणे कारवाई करून न्याय द्यावा. अशी विनंती करुन, गैरअर्जदार सावकार यांनी विनापरवानगीने सावकारकीने केलेल्या काही खरेदीखताच्या छायांकीत प्रती सोबत सादर केल्या आहे. इतर पुरावे या नंतर सादर करण्याची परवानगी द्यावी. कारण सदर गैरअर्जदारांचे बरेच व्यवहार आहे परंतु गैरअर्जदार सावकार यांचे दडपण धाकामुळे कोणी समोर येऊन बोलत नाही. या बाबत चौकशी करून अर्जदार यांची बेकायदेशीर सावकारीच्या ताब्यातुन मुक्तता करावी व न्याय द्यावा. अशी विनंती करून अर्जदार यांच्या वडीलाकडून सावकारी व्यवहारात गट नं. ५५ मौजे लांझी ता.गंगापूर मधील २ एकर जमीनीचा लिहुन घेतलेला दस्त रद्द करून गैरअर्जदार सावकारा विरुध्द कायदेशिर कार्यवाही करावी अशी विनंती केली आहे.

ज्याअर्थी वाचा क्रमांक २ नुसार अर्जदार श्री.जनार्धन अंबादास गांधिले रा.लांझी ता.गंगापुर जि.औरंगाबाद यांचा दिनांक ०२/०९/२०१४ रोजीचा प्राप्त तक्रारअर्ज सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,गंगापुर यांना महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत नियमानुसार चौकशी करुन अहवाल सादर करणे बाबत कळविण्यात आले. वाचा

क्रमांक ३ नुसार सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.गंगापुर यांनी सदर तक्रारीच्या अनुषंगाने त्यांच्या कार्यालयातील श्री.बि.एम नवथर सहकार अधिकारी श्रेणी-१ यांनी चौकशी करून अहवाल वाचा क्रमांक ४ नुसार सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. गंगापुर यांच्याकडे सादर केलेला आहे. व वाचा क्रमांक ३ नुसार सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. गंगापुर यांनी त्यांचे अभिप्रायासह सदरचा चौकशी अहवाल या कार्यालयाकडे सादर केला आहे.

सदर चौकशी अहवालात नमुद आहे की, अर्जदार यांचे तक्रार अर्जाच्या अनुषंगाने गैरअर्जदार श्रीमती पुष्पाबाई ताराचंद साबळे रा. शिवराई ता. गंगापुर यांचे राहते घरी दि. ०९.०९.२०१५ रोजीच्या झडती कार्यवाही अंतर्गत महाराष्ट्र सावकारी ( नियमन ) अध्यादेश २०१४ मधील कलम १६ अंतर्गत संबंधितांना नोटीस देण्यात आली . तद्नंतर घराची झडती बाबतची कार्यवाही ठिक सकाळी ०८.४५ ते ठिक ११.०० या दरम्यान पुर्ण करण्यात येवुन सविस्तर घर झडती पंचनामा करण्यात आलेला आहे.झडती कार्यवाही दरम्यान एकुण अनुक्रमे ०१ ते ४० यादीप्रमाणे ( एकुन ७ /१२ - २१ पाने , एकुण खरेदीखत संख्या ९९ पाने , ०८ पास बुक व ०१ चेक बुक तसेच ०१ मुदत ठेव प्रमाणपत्र इ. ) कागदपत्रे हस्तगत केलेली आहेत. श्रीमती पुष्पाबाई ताराचंद साबळे रा. शिवराई ता. गंगापुर यांचे राहते घराची प्रत्यक्ष झडती मध्ये **१)** ग. नं. ४८ ७ / १२ - ०६ पाने , ग. नं. ५५ ७ / १२ - ११ पाने , ग. नं. ८१ ७ / १२ - ०१ पाने , ग. नं. ११२ ७ / १२ - ०३ पाने **०२)** एकुन ०८ पासबुक व ०१ चेकबुक **०३)** एकुन ०९ खरेदी खत नक्कल **०४)** ०१ मुदत ठेव प्रमाणपत्र **०५)** करारनामा इत्यादी कागदपत्र ची प्रत मिळालेली आहेत. प्रस्तुत प्रकरणी संपुर्ण घराची झडती अर्जदार श्री. जनार्धन अंबादास गांधीले रा. लांझी ता. गंगापुर यांचे समक्ष करून पंचनामा करण्यात आलेला आहे.

उपरोक्त झडती कार्यवाही अंतर्गत हस्तगत केलेली कागदपत्रे व तक्रारदारानी सादर केलेले कागदपत्रे व त्यांचे कार्यालयातील उपलब्ध कागदपत्रे अनुसरुन प्राधिकृत अधिकारी म्हणून दि. १६.०९.२०१५ रोजी सदर अर्जातील नमुद ग.नं. ५५ मधील २ एकर जमिन क्षेत्राचा प्रत्यक्ष ताबा , चतु;सिमा प्रमाणे लगतचे चार ही खातेदार / शेतकरी , अर्जातील / खरेदीखता वरील नमुद साक्षीदार इ. यांचे समक्ष पंचनामा करुन प्रत्यक्ष जबाब घेण्यांत आले असुन सदर शेतजमीनीस प्रत्यक्ष भेट देऊन दि. १६.०९.२०१५ रोजीचा पंचनामा करण्यांत आलेला आहे. अर्जातील नमुद क्षेत्राचा प्रत्यक्ष ताबा , लगतचे चार (४) ही शेतकरी / खातेदार यांनी उक्त जमिनीचा ताबा अर्जदार श्री जनार्दन अंबादास गांधीले यांचा असुन श्रीमती पुष्पाबाई ताराचंद साबळे रा. शिवराई ता. गंगापुर यांना उक्त क्षेत्रात / जमिनीत बघीतलेले नाही. तसेच सदर खरेदी खतावरील साक्षीदार श्री एकनाथ हरीभाउ नरवडे / उत्तम अंबादास गांधीले यांनी प्रत्यक्ष जबाब दिला की , सदर व्यवहार हा कर्ज देवाण - घेवाण व्यवहारातुन झालेला असुन उक्त व्यवहारास तारण म्हणुन फक्त खरेदीखत करुन देण्यांत आले. तसेच सदर व्यवहारातील रु ३०००० /- व्याजासहीत परत केलेनंतर खरेदीखत परत करण्यांचे ठरलेले होते व त्याचे आम्ही साक्षीदार आहोत, असे स्पष्टपणे म्हणने मांडलेले आहे . तसेच मा.उपविभागीय अधिकारी वैजापुर

(महसुल ) यांचे आदेश दि. ३०.०५.२०११ , मा. तहसिल कार्यालय गंगापुर यांचा पंचनामा दि.१०.०१.२००८, मा.मंडळ अधिकारी शेंदूरवादा / वाळुज यांचा प्रत्यक्ष ताबा स्थळ पंचनामा दि. १७.०६.२०११ तसेच प्राधिकृत तपासणी अधिकारी म्हणून निश्चित केलेल्या दि. १६.०९.२०१५ रोजीच्या स्थळ पंचनामानुसार खरेदी खत करून दिलेपासून आज अखेर सदर मौजे हिरापूर ता.गंगापूर शेती गट नं. ५५ मधील अर्जातील नमुद ०२ एकर जमीन अर्जदार श्री जनार्धन अंबादास गांधीले यांचेच ताब्यात असल्याचे निदर्शनास येते. अर्जासोबत सलग्न केलल्या खरेदी खताच्या नकला पाहता श्री नामदेव दादा गवळी यांची गट नं. २६ मधील एकून क्षेत्रापैकी ०.६० आर जमीन दिनांक ०२.०४.१९९९ रोजी श्रीमती पुष्पाबाई ताराचंद साबळे यांना सावकारी व्यवसायात तात्पुरते खरेदी खत करून दिले व सदर व्यवहारातील रक्कमेचे व्याज देवून मुददल रक्कमे बाबत ग. नं. २६ मधील ०.२० आर जमीन सन २००१ मध्ये कायम विक्री करून उर्वरीत क्षेत्राची दिनांक ०२.०७.२००१ रोजी ०.४० आर जमीनीचे (पलटी )परत खरेदी खत करून घेतले व तसा जबाब समक्ष श्री नामदेव दादा गवळी यांनी सादर केलेला आहे. दिनांक ०९.०९.२०१५ रोजीच्या घर झडती कार्यवाही मध्ये श्रीमती पुष्पाबाई ताराचंद साबळे रा. शिवराई यांचे मिळालेली बँक पासबुके , त्यामधील नोंदी उदा. अजिंठा अर्बन को. ऑफ. बँक म. औरंगाबाद या बँकेचे गैरअर्जदार यांचे पासबुकातील नोंदी दि. ०२.११.२००७ (२.६७ लक्ष) नावे /जमानोंद , दिनांक १६.०५.२००७ जमा नोंद , दिनांक १०.०६.२००९ नावे नोंद , दिनांक २३.०६.२००९ , २५.०६.२००९ नावे नोंदी , दिनांक ३०.०७.२००९ जमा / नावे नोंद, दिनांक १०.१२.२००९ नावे नोंद इत्यादी तसेच जि. म. स. बँक म. शाखा वाळुज येथील बँक खाते क्र. १२५२२ मधील दिनांक ०३.०५.२००२ व त्या पुर्वीच्या बँक खातेवरील नोंदी , महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा वाळुज येथील बॅंफ खाते क्र. ८०००३८७४१३ वरील दिनांक २३.०६.२०१५ रोजी जमा / नावे नोंद या वरुन अर्थिक व्यवहार निदर्शणास येतात . तसेच झडती कार्यवाही अंतर्गत हस्तगत कागदपत्रामध्ये महाराष्ट्र ग्रामिण बँक शाखा वाळुज मुदत ठेव रक्कम रुपये १०,०००००/-पावती क्रं १३६९६९ ( छायांकित प्रत ) दिनांक २८.०३.२०१३ या बाबत विचारणा केली असता समाधानकारक उत्तर दिलेले नाही

प्राधिकृत अधिकारी तथा चौकशी अधिकारी यांचे दिनांक २३.०९.२०१५ अहवालात निष्कर्षात नमुद केले आहे की, गैरअर्जदार यांची घेतलेली घर झडती व तहसिल कार्यालयाचे कागदपत्रे , त्यानुसार प्राधीकृत अधिकारी म्हणुन केलेला प्रत्यक्ष स्थळ पंचनामा,उक्त क्षेत्राचे लगतचे शेतकरी/ खातेदार , तक्रार अर्जातील नमुद क्षेत्राच्या खरेदीखतावरील साक्षीदार यांचे जबाब , झडती कार्यवाहीत मिळालेली एकुन ०९ खरेदी खत प्रती , मुदत ठेव प्रमाणपत्र, बँक पास बुकातील नोंदी प्रस्तुत व्यवहार सन २००० ( दिनांक ३१.१०.२००० ) मध्ये होवुनही प्रत्यक्ष शेताचा ताबा , ७ ब नोंद इ. अर्जदार श्री जनार्धन अंबादास गांधीले रा. लांझी ता. गंगापुर यांचा असल्याने अर्जातील नमुद प्रमाणे उक्त व्यवहार हा सावकारी व्यवसायातुन झालेला असल्याचे निदर्शणास येते, असे स्पष्ट मत व्यक्त केले आहे.

ज्याअर्थी वाचा क्रमांक ५ अन्वये अर्जदार यांनी रू. १०० च्या प्रतिज्ञापत्रासह अर्ज सादर करून सावकारीच्या ओघात खरेदीखत क्र.१८७४३ दिनांक ३१/१०/२००० -करून दिलेली शेतजमिन परत मिळणे बाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जासोबत श्री. बि.एम नवथर सहकार अधिकारी श्रेणी-१ यांचा दि.२३/०९/२०१५ चा चौकशी अहवाल व सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.गंगापुर यांचा अहवाल दिनांक ११/०१/२०१६ त्यासोबत चौकशीच्या वेळी झालेले जाब जवाब व पुरावे इ. कागदपत्रे सादर केलेले आहेत विंनती केली आहे की, ते मौजे लांझी ता.गंगापुर येथील रहिवाशी असून व्यवसायाने शेती करतात त्यांचे वडील यांना दवाखान्याच्या कामामुळे पैशाची अडचण असल्यामुळे सावकारी व्यवसाय करणारी सौ.पुष्पाबाई ताराचंद साबळे रा.शिवराई ता.गंगापुर यांच्याकडुन रु.३००००/- (अक्षरी रु.तीस हजार रु.) दिडी ५ रु. टक्का या हिशोबानी व्याजाने घेतले होते या पैशास धर म्हणुन त्यांचे वडील अंबादास महादु गांधिले रा.लाझी ता.गंगापुर यांच्या नावे असलेली मौजे हिरापुर ता.गंगापुर येथिल गट नं.५५ मधील एकुण क्षेत्रापैकी २ एकर जमीन लिहुन दिलेली आहे.सदर जमीन ही रु.३००००/-रक्कमेस धर म्हणुन तात्पुरत्या स्वरुपाची गहाणखत करुन दिलेली होती.व सदर रु.३००००/-व्यजासह परत केल्या नंतर सदर शेतजमिनीचे खरेदीखत परत पलटुन देणेचे ठरले होते. त्या प्रमाणे सन २००५ मध्ये व्याजासह रक्कम परत केलेली आहे.सन २००५ पासुन सदर जमिन ही परत करणे बाबत मागणी केली असता टाळा टाळ होत आहे. आणि सदर जमिन सावकार श्रीमती पुष्पाबाबई ताराचंद साबळे,यांना लिहुन दिल्यापासुन आज पर्यंत त्यांच्याच ताब्यात असुन ७/१२ उतारा मध्ये पिक पेरा त्यांच्या नावाने आहे.मौजे हिरापुर ता.गंगापुर येथिल गट नं.५५ मधील जमीन क्षेत्र २ एकर त्यांच्या ताब्यात असणे बाबत मा.तहसिलदार प्रत्यक्ष पंचनामा व पिक पेरा संबंधी तलाठी व मंडळधिकारी सजा पिंपरखेड यांचा प्रत्यक्ष ताबा पंचनामा दिनांक १७/०६/२०११ इ.कागदपत्रे अर्जासोबत असुन त्याप्रमाणे सदरील क्षेत्र त्यांच्या ताब्यात आहे. पिकपेराही त्यांच्या नावाने आहे. त्यांच्या अर्जातील नमुद प्रमाणे हा व्यवहार सावकारी व्यवसायातुन झालेला आहे. त्या बाबत मा.उपविभागीय अधिकारी वैजापुर व मा.अतिरिक्त जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे न्यायालयात प्रकरण त्यांच्या हक्कात निकाली काढण्यात आले हि जमीन परत पलटुन न दिल्याने गैरअर्जदारा विरुध्द अवैध सावकारी बाबत तक्रार दाखल केली होती या तक्रारीची चौकशी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. गंगापुर कार्यालयाकडुन करण्यात आलेली आहे. त्या बाबत चौकशी अहवालाची प्रत व जाब जवाब सोबत जोडून सदर जमिन सावकारीच्या ओघात लिहुन दिली असल्याचे स्पष्ट असल्याने सदरचे खरेदीखत क्र. ३६५१ दिनांक ३१/१०/२००० क्षेत्र २ एकर गट नं. ५५ हे **अवैध घोषीत** करुन शेतजमिनीचा मालकी हक्क परत मिळुन देण्यात यावा अशी विनंती केली.

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD * DIST. AURANGABAD *
सत्यमेव जयते

वाचा क्र.६ नुसार अर्जदार व गैरअर्जदार यांना दिनांक २१/०१/२०१६ अन्वये महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ चे कलम १८ नुसार नोटीस देऊन दिनांक १.०२.२०१६, ८.२.२०१६, १५.२.२०१६, २३.२.२०१६ व २९.२.२०१६ अन्वये सुनावणी घेण्यात आली.

दिनांक ०१/०२/२०१६ रोजी च्या सुनावणी दरम्यान अर्जदार व गैरअर्जदार उपस्थित होवुन गैरअर्जदार श्रीमती पुष्पाबाई ताराचंद साबळे रा.शिवराई ता.गंगापूर जि.औरंगाबाद यांनी महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ चे कलम १८ नुसार दिलेल्या नोटीसला पुढील प्रमाणे उत्तर दिलेले आहे.

त्या उत्तरा मध्ये गैरअर्जदार यांनी असे नमुद केले आहे की, दिनांक २१/०१/२०१६ रोजीचे नोटीस मधील मजकुर कळाला असून त्या बाबत सत्य परिस्थितीचा खुलासा करण्यात येत आहे. त्या मौजे शिवराई ता.गंगापूर येथील रहिवाशी असून त्यांचे कुटुंबीय शेती व्यवसाय करुन उदारनिर्वाह भागवित आहे.अर्जदार यांनी सावकारी कायद्या नुसार त्यांच्यावर कारवाई करणे बाबत विनंती केलेली आहे.त्या बाबत जबाब दिल्याचे देखील नमुद केले आहे. तसेच सदरील परिच्छेदामध्ये गट न.५५ मधील २ एकर जमीनीचा व खरेदीखताचा देखील उल्लेख करण्यात आलेला आहे. सदरील संपूर्ण मजकूर हा धादांत खोटा, बनावट व चुकीचा असल्यामुळे तो मान्य नाही. श्री.जनार्दन अंबादास गांधीले यांनी दिलेल्या तक्रारी बाबत कोणताही सबळ पुरावा दाखल केल्याचे दिसून येत नाही. कथीत सावकारी आणि व्याजाबाबतचा उल्लेख हा धांदात खोटा आहे. सदरील व्यवहार हा नोंदणीकृत खरेदीखता प्रमाणे झाला असून आज पर्यंत श्री.गांधीले यांनी सदरील खरेदीखत मा.न्यायालयात आव्हानीत केलेले नाही. तसेच नोंदणीकृत खरेदीखता नंतर त्वरीत जमीन गट न. ५५ मधील २ एकर जमीनीचा ताबा देखील त्यांना देण्यात आला आहे. त्यामुळे तक्रार ही धादांत खोटी बनावट व चुकीची आहे.सदरील जमीनीच्या खरेदी विक्रीच्या व्यवहारात कोणताही सावकारी अथवा व्याजाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

असे की, तक्रारीत मजकूर हा धादांत खोटा बनावट व चुकीचा असल्यामुळे त्यांना मान्य नाही. उलट पक्षी अर्जदार श्री.जनार्दन अंबादास गांधीले व इतर बेकायदेशिर पणे शांततापूर्ण ताब्यास अडथळा निर्माण करीत असल्यामुळे त्यांनी मा.दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर गंगापूर येथे त्यांच्या विरुध्द दावा दाखल केला असून तो न्यायप्रविष्ठ आहे. व त्यात मा.न्यायालयाने त्यांच्या हक्कात मनाई हुकुम देखील मंजूर केला आहे. त्यामुळे त्रास देण्याच्या हेतुने अर्जदाराने खोटा, बनावट रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर जबाब देण्यात आलेला आहे.

असे की, तक्रारीत नमुद केलेला मजकूर की, श्री नामदेव दादा गवळी यांनी दिलेले जबाबाबदल असून तो मजकूर देखील धादांत बनावट व खोटा चुकीचा असल्यामुळे तो मान्य नाही तसेच श्री. हरीचंद्र एकनाथ भवर, रा.लांझी यांच्या बाबत नमुद केलेला मजकूर हा देखील धादांत, बनावट, खोटा व चुकीचा असल्यामुळे मान्य नाही.

असे की, तक्रारीतील मजकुर जो की, घर झडती बाबत नमुद करण्यांत आलेला आहे. त्याबाबत नमुद की, दिनांक २३.१०.२०१५ रोजी लेखी म्हणने सादर केले होते त्यामध्ये देखील यापूर्वीच नमुद केले होते की, आपल्या कार्यालया मार्फत करण्यांत आलेली दिनांक ०९.०९.२०१५ ची संपूर्ण कारवाई ही घटनाबाह्य, बेकायदेशिर व एकतर्फी होती. तसेच सदरील कारवाई करण्यापूर्वी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधियिम २०१४ चे तरतुदी अन्वये त्यांना बाजू

मांडण्याची (तोंडी अथवा लेखी) संधी दिली नाही. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाला डावलून सदरची कारवाई केल्याचे स्पष्ट होत आहे. श्री.जनार्दन अंबादास गांधीले यांच्या वडीलानी दिनांक १२.०४.२००७ रोजी त्यांच्या विरुध्द असा आशय नमुद करून खोटा अर्ज गंगापुर कार्यालयास सादर केला होता. सदरील अर्जावर आपल्या कार्यालयाने १० तारखा देऊन सुनावणीची संधी दिली होती. परंतु त्यानंतर दिनांक ०३.११.२००७ रोजी सदरचा अर्ज निकाली काढून या संदर्भात सक्षम न्यायालयात दाद मागणे योग्य होईल असा आदेश पारीत केला होता. सदरील आदेशाची प्रत सोबत जोडत आहे.

दिनांक १०.०३.२००८ रोजी मा. तहसीलदार गंगापूर यांनी न्यायनिर्णय देऊन गट न.५५ मौजे हिरापूर या जमीनी बाबत तलाठी यांनी दाखल केलेले ७ ब प्रकरण निकाली काढण्यांत येते. अर्जदार यांनी जमीनीच्या ताब्याबाबत मा.दिवाणी न्यायालय गंगापूर येथे रुजू होऊन दाद मागावी असा आदेश श्री अंबादास महादू गांधीले यांना दिलेला होता. सदरील आदेशाची प्रत सोबत जोडत आहे.

MONEYLENDERS AURANGABAD
सत्यमेव जयते
DIST. AURANGABAD

कारवाई मध्ये नमुद करण्यांत आलेले अ.क्र. १ ते ८ या मधील माहिती ही खरेदीखता बाबत, घरा बाबत आणि बँक खात्या बाबत आहे. त्यावरील खुलासा त्यांनी खालील प्रमाणे केला आहे.

श्री.अर्जुन तुकाराम साबळे यांच्याकडून गट क्र. ४८ मधील १ एकर जमीन त्यांनी रुपये ३५,०००/- हे दिनांक ३०.०४.२००१ रोजी त्यांना देऊन रितसर नोंदणीकृत खरेदीखत करून घेतले आहे. तसेच श्री रामदास बन्सी साबळे यांना देखील गट क्र. ४८ मौजे नारायणपूर येथील येथील २० गुंठे त्यांनर १ एकर जमीन ही नगदी रक्कम देऊन नोंदणीकृत खरेदीखता आधारे विकत घेतलेली आहे. त्यांचे पतीने राजूरा शिवारातील गट न. ११२ मधील १ एकर जमीन ही नगदी रक्कम देऊन नोंदणीकृत खरेदीखता आधारे विकत घेतलेली आहे. त्यांनी श्री प्रल्हाद कारभारी जायभाय यांच्याकडून औरंगाबाद येथील प्लॉट देखील विकत घेतलेला आहे. तर श्री प्रभाकर तुकाराम साबळे यांच्याकडून मौजे शिवराई शिवारातील गट क्र. ८१ मधील १ एकर जमीन त्यांनी विकत घेतल्या नंतर सदरील जमीन त्यांनी यापूर्वीच विक्री केलेली आहे. तर श्री उत्तम त्रिबंक पेरे यांच्याकडून देखील सहान जागा त्यांनी विकत घेतलेली आहे. तसेच अजिंठा अर्बन को-ऑप बँक औरंगाबाद शाखा जाधवमंडी येथे त्यांचे बचत खाते आहे आणि महाराष्ट्र ग्रामीण बँक वाळूज येथे देखील आज रोजी रक्कम रुपये ५.००,०००/- हे सुरक्षाठेव म्हणून ठेवलेली आहे. गेल्या अनेक वर्षापासून अत्यंत मेहनतीने शेती करीत असून यापूर्वी त्यांच्या सासऱ्यांनी त्यांच्या ह्यातीत त्यांना आर्थीक मदत केलेली आहे. तसेच मेहंदीपूरा, नारंगपूर शिवारातील त्यांची जमीन धरणात गेल्यामुळे शासनाने त्याचा मोबदला दिला होता. त्या मोबदलातुन देखील त्यांच्या नावावर जमीन विकत घेतलेल्या आहे. तसेच महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा वाळूज येथील मुदत ठेव ही १०,००,०००/- नसून आज रोजी खर्चामुळे फक्त रुपये ५,००,०००/- आहे.

दिनांक २०.१०.२००७ रोजी श्री नामदेव दादा गवळी यांनी शपथपत्र तयार करुन कार्यालयास सादर केले होते की, त्या कोणताही सावकारी व्यवहार करीत नाहीत. तो खरेदीविक्रीचा व्यवहार होता. तसेच श्री.हरीचंद्र पिता एकनाथ

भवर यांनी देखील कार्यालयात यापूर्वी दिनांक १६.१०.२००७ रोजी शपथ पत्र सादर करून हे स्पष्ट केले की, त्या सावकारीचा व्यवहार करीत नाहीत. आणि तो खरेदी विक्रीचा व्यवहार होता. सदरील शपथ पत्राच्या प्रती सोबत जोडलेल्या असुन यांनी नमुद केले की, गैरअर्जदार आणि वर नमुद केलेले इसम हे धादांत खोटे बोलत असून आपली दिशाभूल करीत आहेत. करीता गैरअर्जदार यांनी आपल्याकडे दाखल केलेली तक्रार तात्काळ फेटाळण्यात यावी.

यापूर्वी करण्यांत आलेल्या विधीविसंगत आणि बेकायदेशिर अशा घर झडतीत आढळून आलेल्या खरेदी खताबदल असून श्री अर्जुन तुकाराम साबळे यांनी दिलेला जबाब देखील धांदात खोटा, बनावट व चुकीचा आहे. त्यांनी कधीही, कोणाचीही फसवणुक केलेली नाही. अथवा कोणत्याच व्याजाचा व अथवा सावकारीचा धंदा केलेला नव्हता, व नाही त्यामुळे सदरचे आरोप हे धांदात बनावट स्वरुपाचे आहेत. तसेच श्री रामदास बन्सी साबळे यांनी देखील दिलेला जबाब हा धांदात खोटा आहे. त्यांनी नमुद केले की, श्री रामदास बन्सी साबळे व त्यांचे मा.दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, गंगापूर तसेच मा.उच्च न्यायालय, खंडपिठ औरंगाबाद येथे प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.आपल्या कार्यालयाने यापूर्वी दिनांक २३ नोव्हेबंर २००७ रोजी श्री अंबादास महादु गांधीले म्हणजेच सदरील तक्रादाराचे वडील यांनी याच आशयाची त्यांच्या विरुध्द दिलेली तक्रार मा.उच्च न्यायालय, खंडपिठ नागपूर यांचे याचिका क्र. २३४५/२००६ व इतर मध्ये दिलेल्या निर्देशा प्रमाणे दुय्यम निबंधक यांच्या कार्यालयात रितसर खरेदीखत करून दिलेल्या मालमत्त्मध्ये हस्तक्षेप करण्याचे अधिकार नाहीत. असा यापूर्वीच आदेश पारीत केला होता. सदरील आदेशाची प्रत सोबत जोडत आहे. म्हणून गैरअर्जदार हे वरील नमुद व्यक्तीशी संगणमत करून त्यांना व त्यांच्या कुटुंबावर बेकायदेशिरपणे दबाव निर्माण करीत आहेत. गैरअर्जदार यांनी दिलेली तक्रार व वरील नमुद इसमांनी दिलेले जबाब हे धांदात खोटे आहेत. त्यामुळे सदरची तक्रार त्वरीत फेटाळण्यात यावी आणि गैरअर्जदार व इतर इसमांनी दिलेले खोटे जबाब लक्षात घेता, त्यांच्या विरुध्द त्वरीत कायदेशीर कारवाई करण्यात यावी आणि गैरअर्जदार यांनी खोटी तक्रार आपल्या कार्यालयात दाखल करून आपला विनाकारण वेळ घालवला आणि त्यांची नाहक बदनामी केली म्हणून गैरअर्जदार यास रक्कम रुपये ५०,०००/- चा दंड करण्यांत यावा.

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, गंगापूर यांनी केलेली चौकशी आणि कार्यवाही ही विधीसंगत नसून नैसर्गिक न्यायतत्वाला डावलून केलेली आहे. तसेच तक्रारदार याने देखील सत्य परिस्थिती मा.न्यायालया पासून लपवून ठेवलेली असून यापूर्वी झालेले निकाल हे देखील मुद्दामहून नमुद केलेले नाहीत. तक्रारदाराची तक्रार हीच मुळात बेकायदेशिर असून ती न्यायाच्या दृष्टीने फेटाळण्यात यावी. त्यांनी कधीही कोणताही सावकारी व्यवहार जमीन व मालमत्ते संदर्भात अवैधरित्या केलेला नाही. तसेच कोणताही सावकारी व्यवहार करीत नाहीत. उलटपक्षी, त्यांच्या आणि तक्रारदारामध्ये चालू असलेले न्यायप्रविष्ठ प्रकरण लक्षात घेता, त्यांच्यावर बेकादेशिरपणे दबाव निर्माण करण्यासाठी खोटी तक्रार संगणमत करून तक्रारदाराने दाखल केलेली आहे. करीता वर नमुद केलेली सत्य परिस्थिती आणि सदरील उत्तरासोबत

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD
सत्यमेव जयते
★ DIST. AURANGABAD ★

दाखल केलेले कागदपत्रे लक्षात घेता, तक्रारदाराची तक्रार ही पुरावाहीन विनातथ्य असल्यामुळे ती रक्कम रुपये ५०,०००/- च्या दंडासहीत फेटाळण्यात यावी उपरोक्त प्रमाणे गैरअर्जदार यांनी त्यांचे लेखी म्हणने दाखल केले आहे.

गैरअर्जदार यांनी त्यांच्या लेखी म्हणन्यासोबत दिनांक २३/११/२००७ रोजी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. गंगापुर यांनी दिलेल्या निर्णयाची प्रत सादर केलेली आहे. त्या निर्णयाचे अवलोकन केले आसता असे दिसुन येते की, अर्जदार यांचे वडिलानी गैरअर्जदार यांच्या विरूध्द दिनांक २१/०६/२००७ रोजी अवैध सावकारी बाबत तक्रार केली असल्या बाबत दिसुन येते या बाबत या पुर्वी मुंबई सावकारी अधिनियम १९४६ जुना कायदा अन्वये खरेदीखत करून दिलेल्या मालमत्ते मध्ये हस्तक्षेप करण्याचे अधिकार सहाय्यक निबंधक यांना नसल्याने त्यांनी सदरच्या तक्रारी बाबत सक्षम न्यायालयात दाद मगणे बाबत कळवुन याचीका निकाली काढलेली आहे.

गैरअर्जदार यांनी त्यांचे खुलाशा सोबत श्री नामदेव दादा गवळी यांनी दिनांक २०/१०/२००७ रोजी रू. १० च्या प्रतिज्ञापत्रावर दिलेल्या जवाबाची प्रत सादर केली आहे. त्या जवाबात श्री. नामदेव दादा गवळी यांनी असे नमुद केले आहे की, ते गैरअर्जदार यांना ओळखतात त्यांनी गैरअर्जदार यांना त्यांची मालकीची नारायणपुर ता. गंगापुर येथील गट नंबर २६ मधील १ एकर २० आर शेतजमिन खरेदीखता आधारे कायम स्वरूपी विक्री केली होती या व्यवहारात कोणताही सावकारी व्यवहार नव्हता सदरील शेतजमिनी गैरअर्जदार यांनी दुसऱ्यास विकली आहे त्यांची गैरअर्जदार बाबत कुठलिही तक्रार नाही. गैरअर्जदार हया कुठल्याही व्याजाचा किंवा पैशाचा सावकारी व्यवहार करीत नाही.

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD
सत्यमेव जयते
DIST AURANGABAD

गैरअर्जदार यांनी त्यांचे खुलाशा सोबत श्री हरीशचंद्र पिता एकनाथ भवार यांनी दिनांक १६/१०/२००७ रोजी रू. १० च्या प्रतिज्ञापत्रावर दिलेल्या जवाबाची प्रत सादर केली आहे. त्या जवाबात श्री. हरीशचंद्र पिता एकनाथ भवार यांनी असे नमुद केले आहे की, ते गैरअर्जदार यांना ओळखतात त्यांनी गैरअर्जदार यांना त्यांची मालकीची मौजे लांझी ता. गंगापुर येथील गट नंबर४५मधील १ एकर शेतजमिन खरेदीखता आधारे कायम स्वरूपी विक्री केली होती या व्यवहारात कोणताही सावकारी व्यवहार नव्हता सदरील शेतजमिनी गैरअर्जदार यांनी विक्री काढल्यामुळे ही शेतजमिन त्यांनी खरेदी केलेली आहे. त्यांची गैरअर्जदार बाबत कुठलिही तक्रार नाही. गैरअर्जदार हया कुठल्याही व्याजाचा किंवा पैशाचा सावकारी व्यवहार करीत नाही.

गैरअर्जदार यांनी त्यांच्या खुलाशा सोबत दिनांक १०/०३/२००८ रोजी मा. तहसिलदार यांनी दिलेल्या न्याय निर्णयाची प्रत दाखल केलेली आहे. त्या न्याय निर्णयानुसार मा. तहसिलदार यांनी गट नंबर ५५ या जमिनी बाबत तलाठी यांनी दाखल केलेले ७ ब प्रकरण निकाली काढलेले आहे. जमिनीचे ताब्या बाबत दिवाणी न्यायालय गंगापुर येथे दाद मागावी असे आदेशात नमुद केलेले आहे.

दिनांक १५.०२.२०१६ रोजीच्या सुनावणीस अर्जदार व गैरअर्जदार उपस्थित होऊन अर्जदार **श्री.जनार्दन** अंबादास गांधीले यांचे मार्फत ॲड. ए.सी.खवले पाटील यांनी लेखी म्हणने पुढील प्रमाणे सादर केले **की, अर्जदार** यांचे वडील श्री.अंबादास महादू गांधीले यांना पैशाची गरज असल्याने शिवराई येथील गैरअर्जदार सौ.पुष्पाबाई ताराचंद साबळे या खाजगी सावकाराकडे व्याजाने पैसे मागीतले त्या वेळी खाजगी सावकार बाईने त्यांच्या वडीला समोर व्याजाने पैसे देण्याची तयारी दर्शविली. परंतु २ एकर जमीनीची रजिस्ट्री त्यांच्या नावावर स्वखर्चाने करून द्यावी, जमीनीचा ताबा मुळ मालकाचा राहील व कर्जाचे पैसे व्याजासहीत परत मिळाल्या नंतर करुन दिलेले दस्त (रजिस्ट्री) उलटून देईन अशा अटी घातल्या व सांगीतले की, सर्वांना अशाच अटीवर व्याजाने पैसे देते त्यांनी आजू बाजूच्या खेड्यातील बऱ्याच लोकांना अशाच पध्दतीने व्याजाचे पैसे देऊन रजिस्ट्री दस्त स्वतःच्या नावावर करून घेतले आहेत. तसेच काही गरजू लोकाना व्याजासईत पैसे परत केल्या नंतर दस्त उलटून सुध्दा दिले, काही गरजू लोकाना तिचे व्याज देणे जड झाले म्हणून तिच्या जोखडीतुन मुक्त होण्या करीता आपल्या जमीनी दुसऱ्याना विक्री करून व्याजासहीत पैसे परत करून ज्यांना विक्री केली त्या लोकांच्या नावावर तिचे कडून खरेदीखत करून द्यावे लागले.

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD ★ DIST. AURANGABAD ★
सत्यमेव जयते

त्यांच्या वडीलाना पैशाची अंत्यत आवश्यकता असल्याने तिच्या सर्व अटी मान्य केल्या व त्याच प्रमाणे त्यांचे मालकी व ताब्यातील गट न. ५५ मौजे हिरापूर ता.गंगापूर शिवारातील जमीनीचा दस्त करून दिला. ठरलेल्या अटी नुसार जमीन तेव्हा पासून आज पर्यंत त्यांचे ताब्यात आहे. सदर सावकार बाईला त्यांच्या वडीलानी व त्यांनी स्वतः आणि दोन गावातील प्रतिष्ठीत नागरीक यांना सोबत घेऊन सन २००५ मध्ये संपूर्ण कर्ज व्याजासहीत परत दिले व जमीनीचा दस्त उलटून देण्याची विनंती केली. तेव्हा सदर सावकार बाईने आठ दिवसाने करून देते नंतर करून घेऊ असे सांगून टाळाटाळ केली व नंतर त्यांचे संपूर्ण कुटुंबा विरुध्द खोटा दावा दाखल केला व मनाई हुकुम घेऊन जमीन बळकविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या त्यात सफल झाल्या नाहीत. त्या नंतर त्यांनी दाखल केलेला दावा खारीज झाला व तात्पूरता मनाई हुकुम सुध्दा खारीज झाला. सदर व्यवहार पुर्णपणे सावकारी व्यवहार आहे या बाबत सदर व्यवहारास साक्षीदारांचे प्रतिज्ञापत्र सुध्दा दिले आहेत. सदर सावकार बाईने आसपासच्या खेड्यात बऱ्याच लोकाना व्याजाने पैसे देऊन जमीन व पैसे हडप केलेले आहेत. जमीन त्यांच्या ताब्यात असल्या बाबत सुध्दा तसे साक्षीदार ७/१२ उत्तारे तलाठी, तहसिलदार इत्यादी निर्णय त्यांच्या बाजूने दिलेले आहे. तरी सुध्दा सदर सावकार बाई हेतुपुरस्कर जमीन बळकविण्याच्या उद्देशाने व्याजासहीत पैसे घेऊन सुध्दा जमीन उलटवून देत नाही. तरी या बाईच्या सावकारी पाशातुन मुक्त करून त्यांची जमीन त्यांच्या नावावर करण्यात येऊन न्याय देण्यात यावा अशी विनंती केली.

तसेच पुढे नमुद केले आहे की, मा.दिवानी न्यायाधिश, गंगापूर यांचे कोर्टात खरेदी खतावरील साक्षीदार जमीनीच्या आजूबाजूचे शेतकरी यांनी शपथेवर त्या बाबत साक्षी दिलेले आहेत. त्या प्रमाणीत प्रतीच्या झेरॉक्स दाखल केलेल्या आहे. तसेच गैरअर्जदार सौ.पुष्पाबाईने सांगीतल्या प्रमाणे त्या लोकानी प्रतिज्ञापत्र करून दिले हे पूर्णपणे खोटे

आहे, त्या लोकानी तसे न्यायालया समोर सांगीतले आहे. तिने अशाच बऱ्याच कोऱ्या स्टॅम्पवर लोकांच्या सह्या घेऊन ठेवल्या आहेत व त्याचा दुरुपयोग करीत आहेत. तरी तिचे विरुध्द कडक कार्यवाही करून त्यांच्या जमीनी शिवाय इतर गरीब गरजू शेतकऱ्यांच्या जमीनी त्यांचे तावडीतुन मुक्त कराव्यात. सदर सावकार बाईला त्यांची सदर जमीन सुध्दा माहिती नाही. परंतु फक्त सावकारी व्यवहारातील रजिस्ट्री आधारे ती जमीन बळकविण्याच्या हेतुने खोट्या तक्रारी दाखल करते. तिने सांगीतल्या प्रमाणे तहसिलदार यांच्या निकाला विरुध्द उपजिल्हाधिकारी वैजापुर येथे अपिल दाखल केले होते. त्यात मा.उपजिल्हाधिकारी यांनी तहसिलदार यांचा निर्णय रद्द केला आहे. व त्या निर्णया विरोधात गैरअर्जदारानी मा.जिल्हाधिकारी यांचेकडे केलेले अपिल सुध्दा खारीज झालेले आहे.त्यामुळे मा.तहसिलदार गंगापूर यांचा निर्णय वरिष्ठानी फेटाळल्या नंतर सुध्दा गैरअर्जदार खोटे कथन करून तहसीलदार यांचे आदेशाची प्रत दाखल करून दिशाभुल करण्याचा प्रयत्न करीत आहे. करीता मा.उपजिल्हाधिकारी वैजापुर यांच्या न्याय निर्णयाची प्रत मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडील गैरअर्जदार सौ.पुष्पाबाई यांची अपिल खारीज झाल्या बाबतच्या नकला सोबत जोडल्या आहेत. तसेच इतर व्यवहारा बाबत फेरफार, उत्तारे, तहसलिदार यांचे पंचनामे दाखल केले आहेत. गैरअर्जदारांचा दाखल केलेला दावा खारीज झालेला होता. त्याची नक्कल इत्यादी सर्व कागदपत्रे सोबत जोडली आहे. तरी गैरअर्जदार सौ.पुष्पाबाईने दाखल केलेले खोटे कथन फेटाळण्यात यावे व न्याय देऊन सावकारी व्यवहारातील त्यांच्या मालकीची गट न.५५ हिरापूर शिवार ता.गंगापूर मधील २ एकर जमीन खाजगी सावकार सौ.पुष्पाबाईचे तावडीतुन मुक्त करून त्यांना परत देऊन न्याय द्यावा अशी विनंती केली.

अर्जदार यांनी त्यांच्या खुलाशा सोबत दावा क्रमांक आर.सी.एस. नंबर ८/२००८ मधील मा. दिवाणी न्यायालयाच्या निर्णयाची प्रत दाखल केली आहे .

अर्जदार यांनी त्यांच्या खुलाशा सोबत श्री. अर्जुन तुकाराम साबळे यांनी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, गंगापुर यांच्या समक्ष दिनांक ०९/१०/२०१५ रोजी दिलेल्या जवाबाची प्रत सादर केली असुन त्या जवाबात श्री. साबळे यांनी असे नमुद केले आहे की, त्यांनी त्यांच्या भावकीतील गैरअर्जदार श्रीमती पुष्पाबाई ताराचंद साबळे यांना सन २००१ मध्ये आईच्या आजारपणाच्या खर्चासाठी पैशाची मागणी केली असता त्यावेळी गैरअर्जदार यांनी सांगितले की, पैसे देण्यात येईल तथापी जमिनीचे खरेदीखत करून दयावे लागेल त्या वेळी त्यांनी गैरअर्जदार यांच्याकडुन रू.३००००/- ११ महिन्यासाठी दिढी या व्याज पध्दतीने घेतले होते. या बदल्यात त्यांनी त्यांची नारायणपुर शिवारातील गट नंबर ४८ मधील ४० आर जमिनीचे खरेदीखत गैरअर्जदार यांच्या नावाने दिनांक ३०/०४/२००१ रोजी करून दिले होते. या नंतर २ वर्षांनी त्यांनी रू ६००००/- रोख परत केले व शेतजमिन परत करणे बाबत त्यांना विनंती केली परंतु त्यांनी जमिनी परत करण्यास टाळाटाळ केली. त्या वेळी ही जमिनी त्यांच्याच ताब्यात होती. गैरअर्जदार यांची दुसरी जमिन त्यांच्या शेजारीच असल्याने त्यांना विहीरीला पाणी येते त्यामुळे बटाईने म्हणुन वरील शेतजमिन मागितली तेव्हा त्यांना वाटले की, उत्पन्न

वाढेल व त्यांच्याकडील रक्कम कर्जात जमा होईल परंतु गैरअर्जदार यांनी त्यांना ऊसाचे पैसे सुध्दा दिले नाही. ते गरीब असल्याने भांडन तंटा करण्यास दुसरे कोणीही नव्हते गैरअर्जदार यांनी गोड बोलुन जमिन त्यांच्या ताब्यातुन घेतली व त्याचा फेर फार व ७/१२ वर नोद करून घेतली ही जमिन आजदेखील गैरअर्जदार यांच्याच ताब्यात आहे. काही दिवसानंतर ते पुन्हा रू.१,००,०००/- देण्यास तयार झाले तथापी गैरअर्जदार यांनी जमिनी परत करण्यास नकार दिला. गैरअर्जदार श्रीमती पुष्पाबाई साबळे हया अवैध सावकारी करतात व व्याजाने पैसे वाटप करून शेतकऱ्यांच्या जमिनी घेत असल्याने त्यांच्या विरूध्द कार्यवाही करावी असा जवाब नोंदविलेला आहे.

अर्जदार यांनी त्यांच्या म्हणन्यासोबत श्री. रामदास बन्सी साबळे रा. शिवराई यांनी दिनांक ०९/१०/२०१५ रोजी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. गंगापुर यांच्या समोर हजर होऊन शपथपुर्वक लिहुन दिलेल्या जवाबाची प्रत सादर केली असुन त्या जवाबात श्री. साबळे यांनी असे नमुद केले आहे की, त्यानी गैरअर्जदार सावकार यांच्याकडुन मुलीच्या लग्नासाठी सन २००० व २००१ मध्ये दोन टप्यात एकूण रू. ३००००/- सावकारी कर्ज १० टक्के दराने घेतले होते त्या बदल्यात त्यांनी त्यांची मौजे नारायणपुर शिवारातील गट नंबर ४८ मधील २० आर जमिन खरेदीखत दिनांक ०२/०५/२००१ रोजी गैरअर्जदार यांच्या नावाने करून दिले होते. त्यांनी २ ते ३ वर्षात या बद्दल रू. ६००००/- परत केलेले होते. जमिन परत पलटवुन देण्यासाठी सांगितले होते. तथापी गैरअर्जदार यांनी नकार देऊन जमिनीचा ताबा घेतला व फेर फार नोद त्यांच्या नावाने करून घेतली या बाबत वाद मा. दिवाणी न्यायालय गंगापुर येथे चालु होता. त्या दाव्याचा निकाल मिळाला नाही. त्यांनी सुध्दा पाठपुरावा केला नाही. गैरअर्जदार हे त्यांच्या भावकीतील असुन त्यांच्या जमिनी लगतच गैरअर्जदार यांची जमिन आहे. त्यांना पैशाची गरज असल्याने फसवणुक करून गैरअर्जदार यांनी त्यांची जमिन घेतली आहे. गैरअर्जदार यांचा सावकारीचा व्यवहार आहे त्यातुन त्यांनी अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या आहे. त्यामुळे त्यांच्या विरूध्द कार्यवाही करून त्यांची जमिन परत मिळावी या साठी जवाब सादर केलेला आहे.

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD
DIST. AURANGABAD

गैरअर्जदार यांनी त्यांचे म्हणन्यासोबत श्री. नामदेव दादा गवळी यांनी दिनांक १९/०९/२०१४ रोजी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था , ता. गंगापुर यांच्या समक्ष दिलेल्या जवाबाची प्रत सादर केली असून त्या जवाबात श्री गवळी यांनी असे नमुद केले आहे की, त्यांनी आर्थीक गरजेपोटी सन १९९९ मध्ये त्यांच्या गावातील सावकार गैरअर्जदार यांच्याकडुन रू. ३००००/- ५ टक्के व्याजाने घेतले होते. त्या बद्दल त्यांनी मौजे नारायणपुर शिवारातील गट नंबर २६ मधील १ एकर २० आर जमिनीचे खरेदीखत दिनांक १५/०४/१९९९ रोजी करून दिले होते. त्यांनी रकमेचे व्याज गैरअर्जदार यांना २ वर्षा पर्यंत दिले तदनंतर मुद्दल रक्कम देणे त्यांना अवघड झाल्याने त्यांनी त्यांची याच गटातील २० आर शेत सन २००१ मध्ये विक्री करून गैरअर्जदार यांची संपुर्ण रक्कम परत केली. त्यांचे वरील नमुद १ एकर २० आर जमिनीचे खरेदीखत दिनांक ०२/०७/२००१ रोजी करून घेतले त्यांनी वरील जमिन सावकारी पोटीच गैरअर्जदार यांनाच लिहुन दिली होती. परंतु त्यांच्याकडे पैसे नसल्याने दुसरी जमिन विक्री करून ही १ एकर २० आर जमिन परत मिळवली

आहे. गैरअर्जदार हया सावकारीचा व्यवहार करतात त्यांनी अर्जदार यांची शेतजमिन सावकारी कर्जात घेतली आहे. या बाबत त्यांना माहिती आहे. असा जवाब लिहुन दिलेला आहे.

गैरअर्जदार यांनी त्यांचे म्हणन्यासोबत उपविभागीय अधिकारी वैजापुर यांच्या दिनांक ३०/०५/२०११ च्या निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे. त्यानुसार उपविभागीय अधिकारी वैजापुर यांनी तहसिलदार गंगापुर यांचा निर्णय रद्द केलेला आहे. या आदेशाद्वारे तहसिलदार गंगापुर यांना या प्रकरणी शेतजमिनीवर कोणाचा ताबा आहे याची चौकशी करावी व अर्जदार यांचा ताबा असल्यास त्या बाबतची नोंद वहीतीत अर्जदार यांच्या नावाने करावी असे आदेश दिलेले आहे.

अर्जदार यांनी त्यांच्या म्हणन्यासोबत दिनांक १०/०१/२००८ रोजीचा पंचनामा सादर केला असून त्यात असे नमुद केले आहे की, मा. तहसिलदार गंगापुर यांनी बोलावण्यावरून पंचलोक हजर होऊन पंचनामा करून दिलेला आहे. त्यानुसार गट नंबर ५५ मधील ८० आर शेतजमिनी बाबत ७ ब लावणे बाबतचा पंचानामा असून या ८० आर क्षेत्रात कापूस पिक होते. आता गहु पेरलेले असून सन २००७-२००८ पासुन पिकपेरा जमिनी बाबत अर्जदार यांचा ताबा असून या जमिनीची मेहणत मशागत त्यांनीच केली आहे. असा पंचनामा केलेलाआहे.

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD
सत्यमेव जयते
DIST AURANGABAD

या जमिनीच्या ताब्या बाबत शेतजमिनीच्या शेजारील पंच श्री. नानसाहेब विठ्ठल देवकर, श्री. बन्सी काशिनाथ सातपुते, श्री. भिकाजी भानुदास गांधीले व श्री. दिलीप रावसाहेब जगदाळे यांनी तलाठी यांच्याकडे दिनांक १०/०१/२००८ रोजी जवाब सादर केले असून त्यांच्या जवाबानुसार सदरील शेतजमिनीवर अर्जदार यांचाच ताबा असल्या बाबत जवाबात नमुद आहे.

याच जमिनीच्या ताब्या बाबत मा. उपविभागीय अधिकारी वैजापुर यांचा दिनांक ३०/०५/२०११ च्या निर्णयानुसार तहसिल कार्यालयाकडुन चौकशी करण्यात आलेली असून त्या नुसार दिनांक १७/०६/२०११ रोजी ताब्या बाबतचा पंचनामा केलेला आहे. त्यावर मंडळ अधिकारी तथा तलाठी यांच्या सह त्यावर आठ पंचाच्या सहया आहेत. या पंचनाम्यानुसार सदरील गट नंबर ५५ मधील २ एकर शेतजमिन ही पुर्वी पासुन अर्जदार यांच्या ताब्यात असून सन २०११-२०१२ या वर्षी त्या जमिनीमध्ये कापुस पिकाची लागवड केली असल्या बाबत पंचानाम्यात नमुद आहे. या पंचनाम्यानुसार मंडळ अधिकारी यांनी दिनांक २२/०६/२०११ रोजी तहसिलदार यांना जमिनीचा ताबा हा अर्जदार यांचा असल्या बाबत अहवाल सादर केलेला आहे.

अर्जदार यांनी त्यांच्या म्हणन्यासोबत दावा क्रमांक ८/२००८ मध्ये मा. दिवाणी न्यायालय गंगापुर येथे श्री. एकनाथ हरीभाऊ नरवाडे यांनी न्यायालयात दिलेल्या साक्षीची प्रत सादर केली असून त्यानुसार त्यांचे सर तपासणी प्रतिज्ञापत्रात नमुद आहे की, ते गैरअर्जदार व अर्जदार यांना ओळखतात दावा मिळकत ही पुर्वी पासुन ते आजपर्यंत अर्जदार यांच्या ताब्यात असून गैरअर्जदार हया सावकारीचा व्यवहार करतात अर्जदार यांचे वडील यांनी गैरअर्जदार

यांच्याकडुन व्याजाने पैसे घेतले होते. त्या पैशाला धर म्हणुन वादातील मिळकत दस्त करून दिली होती. या व्यवहार वर साक्षीदार म्हणुन त्यांनी सही केलेली आहे. सावकारीचा व्यवहार हा दिढीचा होता जमिन अर्जदार यांच्याच ताब्यात राहील असे ठरलेले होते अर्जदार यांनी गैरअर्जदार यांना व्याजासह पैसे त्याच्या समक्ष परत केलेले आहे हा व्यवहार त्यांच्या समक्ष झालेला आहे. असे असतांना सुध्दा जमिनीचा दस्त गैरअर्जदार यांनी उलटुन दिलेला नाही. दावा मिळकतीवर अर्जदार यांचे वडीलांचा ताबा होता त्यांचे मृत्युनंतर या जमिनीवर अर्जदार यांचा ताबा आहे. त्यावर ते पिक घेत आहे. याचा उलटतपास गैरअर्जदार यांचे वकील यांनी घेतलेला होता. त्या उलट तपासातही त्यांनी सदर व्यवहार हा सावकारीचा असून वादातीत मिळकतीवर अर्जदार यांचाच ताबा असल्याचे त्यांनी सांगितलेले आहे.

अर्जदार यांनी त्यांच्या म्हणन्यासोबत मा.दिवाणी न्यायालय गंगापुर येथे दावा क्रमांक ८/२००८ मध्ये तलाठी श्री. संतोष पिता अनंत धर्माधिकारी यांचे सरतपासणी प्रतिज्ञापत्र सादर केले असून त्या प्रतिज्ञापत्रानुसार तलाठी श्री. संतोष पिता अनंत धर्माधिकारी यांनी न्यायालयात असे नमुद केले आहे की, त्यांनी दिनांक १०/०१/२००८ रोजी केलेला वादग्रस्त जमिनीचा पंचनामा खरा आहे. उलट तपासातही ही बाबत त्यांनी मान्य केलेली आहे.

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD
DIST. AURANGABAD

अर्जदार यांनी त्यांच्या म्हणन्यासोबत मा.दिवाणी न्यायालय गंगापुर येथे दावा क्रमांक ८/२००८ मध्ये श्री. बन्सी काशिनाथ सातपुते यांचे सरतपासणी प्रतिज्ञापत्र सादर केले असून त्या प्रतिज्ञापत्रानुसार श्री. बन्सी काशिनाथ सातपुते यांनी न्यायालयात असे नमुद केले आहे की, वादातील मिळकती शेजारीच त्यांची शेतजमिन असून वादातीत मिळकतीवर अर्जदार यांचा ताबा असून गैरअर्जदार यांना या शेतजमिनीत त्यांनी कधीही पाहीलेले नाही. ही बाब त्यांनी उलट तपासातही मान्य केलेली आहे.

अर्जदार यांनी त्यांच्या म्हणन्यासोबत मा.दिवाणी न्यायालय गंगापुर येथे दावा क्रमांक ८/२००८ मध्ये त्यांनी त्यांचे सरतपासणी प्रतिज्ञापत्र सादर केले असून त्या प्रतिज्ञापत्रानुसार अर्जदार यांनी न्यायालयात तक्रार अर्जातील नमुद तपशिल सदर प्रतिज्ञापत्रात व उलट तपासात नमुद केला आहे.

अर्जदार यांनी त्यांच्या म्हणन्यासोबत मा.दिवाणी न्यायालय गंगापुर येथे दावा क्रमांक ८/२००८ मध्ये श्री दिलीप रावसाहेब जगदाळे यांचे सरतपासणी प्रतिज्ञापत्र सादर केले असून त्या प्रतिज्ञापत्रानुसार श्री. दिलीप रावसाहेब जगदाळे यांनी न्यायालयात असे नमुद केले आहे की, ते अर्जदार व गैरअर्जदार यांना ओळखतात त्यांची मौजे हिरापुर ता. गंगापुर येथे गट नंबर ५५ मध्ये शेतजमिन आहे. या जमिनी शेजारी त्यांची जमिन आहे. ती त्यांनी १ वर्षापुर्वी विक्री केलेली आहे. गट नंबर ५५ मधील शेतजमिन अर्जदार हे स्वताः कसतात या मध्ये गैरअर्जदार यांना त्यांनी कधीही पाहीलेले नाही. या शेतजमिनीमध्ये अर्जदार यांनी खाम नदीवरून पिव्हीसी पाईप लाईन द्वारे पाणी आणले असून ते शेतात बागाईती पिके घेतात. या बाबत उलट तपासात ही सदर बाब त्यांनी मान्य केलेली आहे.

अर्जदार यांनी त्यांचे म्हणन्यासोबत मा.दिवाणी न्यायालय गंगापुर येथे दावा क्रमांक ८/२००८ मध्ये श्री. नामदेव पिता दादा गवळी यांचे सरतपासणी प्रतिज्ञापत्र सादर केले असून त्या प्रतिज्ञापत्रानुसार श्री. नामदेव पिता दादा गवळी यांनी न्यायालयात असे नमुद केले आहे की, त्यांनी गैरअर्जदार हे सावकारी करीत असल्याने त्यांनी सन १९९९ मध्ये यांच्याकडुन व्याजाने पैसे घेतले होते. त्यावेळी त्यांच्या मालकीची गट नंबर २६ मधील १ एकर २० आर शेतजमिनीचा खरेदीचा कागद त्यांच्याकडुन लिहुन घेतला होता त्यानंतर त्यांनी संपुर्ण रक्कम व्याजासहीत परत केल्यावर पैसे घेतावेळेस जो जमिनीचा कागद करून दिला होता. तो परत त्यांच्या हक्कात करून घेतला आहे. गैरअर्जदार हया त्यांनी जसा कागद करून दिला होता तसाच कागद इतरांकडुन पैसे देतांना करून घेतात असे प्रतिज्ञापत्र करून दिलेले आहे. उलट तपासातही ही बाब त्यांनी सांगितलेली आहे.

अर्जदार यांनी त्यांच्या म्हणन्यासोबत मा. सर्वच्च न्यायालयातील केस नंबर २६३४/२००४ व मा. उच्च न्यायालय लखनऊ येथील दिवाणी अर्ज ५५/१९७५ मधील निर्णयाची प्रत सादर केलेली आहे.

ज्या अर्थी,दिनांक २९.२.२०१६ रोजीच्या सुनावणीस अर्जदार श्री.जनार्दन अंबादास गांधीले याचे मार्फत ॲड बि.आर.राजपुत गैरअर्जदार श्रीमती पुष्पाबाई ताराचंद साबळे यांचे मार्फत ॲड.राहुल जोशी उपस्थित झाले अर्जदार यांचे वतीने ॲड.बि.आर.राजपुत यांनी म्हणणे मांडले की,यापुर्वी दिलेले लेखी म्हणने ग्राहय धरावे आणि युक्तीवाद केला की, सहाय्यक निबंधक,गंगापुर यांचा अहवाल व सोबतचे जवाबा नुसार महसुल यांना जे अधिकार आहेत.त्याप्रमाणे जमिन त्यांच्या ताब्यात आहे,तसेच तहसिल कार्यालयाने जो निकाल दिला होता. त्याचे विरुध्द अपिल केले आहे. व अपिलामध्ये सदर निकाल रद्द झाला आहे. ताब्याच्या बाबतीत महसूल विभागाकडून त्यांचा ताबा कायम केलेला आहे. तसेच गैरअर्जदाराच्या वतीने उलट तपाससुध्दा झालेला आहे. तसेच एका साक्षीदाराचे खरेदीखत गैरअर्जदारानी उलटून दिलेले आहे. सदर खरेदी वरील साक्षीदार यांना न्यायालयाने तपासले आहे. व त्यानी सदर व्यवहार सावकारीचा असल्या बाबत सांगीतले आहे. त्यांचे नाव श्री.एकनाथ हरीभाऊ नरवडे आहे. तसेच श्री.हरिचंद्र एकनाथ भवर यांना जमिनीचे व्यवहारात खरेदीखत पलटवुन दिलेले आहे. गैरअर्जदार यांनी खरेदी केलेल्या जमिनीसाठी उत्पन्नाचे साधन काय आहे? आणि गैरअर्जदार यांनी खरेदी केलेल्या श्री. नामदेव दादा गवळी व श्री. हरिचंद्र एकनाथ भवर यांचे व्यवहार सोडुन उर्वरित १३ जमिनीचे व्यवहार वाळुज शिवारातील आहे. तसेच गैरअर्जदार यांचा शेतीशिवाय इतर कोणताही व्यवहार नाही.मा. न्यायालयासमोर गैरअर्जदार यांनी धरणाचे पैसे आले असे नमुद केले आहे. इतर ठिकाणी असे कोठेही नमुद नाही. गैरअर्जदार यांचेकडे सावकारी परवाना नाही,गैरअर्जदार यांनी काही खरेदी नातेवाईकांच्या व त्यांनी सामिलत्यावरुन इतर लोकांच्या नावावर खरेदी व्यवहार केलेला आहे. यापुर्वी सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,गंगापुर यांनी निर्णय दिला होता, तो मा.उच्च न्यायालय खंडपिठ नागपुर प्रमाणे दिलेला आहे.जो की, त्यावेळी खरेदी खत पलटुन देण्याचा अधिकार त्यांना नव्हता तेव्हा फक्त खरेदीविक्री डिसाईड केली होती.महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम

२०१४ या नविन कायद्या नुसार कलम १८ अन्वये सावकारी संबधाने जमीन खरेदीखत गहाणखत निर्णय घेण्याचा अधिकार या प्राधिकरणास दिलेला आहे. सदरचा दस्त जरी खरेदीखताने झाला असला तरी सदर **खरेदीखत सावकारी** मध्ये झाल्याचे सिध्द होते.मा.दिवाणी न्यायाधिश (कनिस्ट स्तर) गंगापुर येथे दाखल Rcs n.८/२००८ **मध्ये मनाई हुकुम** दिनांक २३/०२/२००९ रोजी गैरअर्जदार यांचे हक्कात मनाई हुकूमाचा दावा झालेला असला तरी दिनांक **३१/०७/२००९** रोजी मुळ आर.सी.एस. ८/२००८ प्रकरण खारीज झालेले असल्याने दिनांक २३/०२/२००९ **रोजी दिलेल्या मनाई** हुकूमाचा परिनाम निष्प्रभ झालेला आहे. तसेच पुर्ववत झालेल्या दाव्यामध्ये मनाई हुकुम नव्हता. मा.उच्च न्यायालय अलाहाबाद व मा.सुप्रीम कोर्ट चे न्यायनिर्णय ए.आय.आर.१९७६' साईस्टेशन २००४ ए.आय.आर.३९९२/२००४ चे सोबत दाखल केलेले आहे. त्यामुळे सदर प्रकरणी मा.कोर्टाची स्पेसीपिक आदेश पाहिजे. म्हणून सावकारी व्यवहार सिध्द होतो. दावा मनाई हुकमाचा असल्याने सदर प्रकरणी या न्यायालयाला अडचण येत नाही.

REGISTRAR OF MONEYLENDERS A... * DIST. AURANGABAD
सत्यमेव जयते

यावर गैरअर्जदार यांचे वकील ॲड.राहूल जोशी यांनी युक्तीवाद केला की, सदर खरेदीखत दिनांक २१.१०.२००० रोजी झालेले आहे. सदर व्यवहार हा गैरअर्जदार व श्री.अंबादास महादू गांधीले यांच्यात झालेला असुन अर्जदार यांचा या व्यवहाराशी संबंध येत नसुन, सदर खरेदीखतावर प्रस्तुत अर्जदार हे साक्षीदार आहेत. सन २००० साला पासून १५ वर्षा पर्यंत अर्जदार यांनी सदर प्रकरणी कोणताच अर्ज केला नाही. तसेच सदर प्रकरणी अर्जदार यांना अर्ज करण्याचा कोणताही अधिकार नाही. श्री.अंबादास महादू गांधीले यांना किती मुले आहेत यांचा उल्लेख नाही, इतर वारसानी अर्जदार यांना प्रस्तुत प्रकरणी अधिकार दिल्याचा उल्लेख नाही. No Locus Standi अर्जदाराचा युक्तीवाद हा दावा क्र. ८/२००८ यावर होता. सदर दावा न्यायालयात दाखल झाला असल्याने त्याचा सावकारी व्यवहाराशी काही संबंध नाही. त्यातील साक्षीपुरावे हे मनाई हुकुमा बाबत आहेत. त्याचे शपथपत्र दाखल नाही. त्यांचा कोणताच पुरावा या न्यायालया समोर शपथेवर देण्यात आलेला नाही. आजु बाजूच्या शेजाऱ्यानी त्यांच्या बाजूने जबाब दिलेला आहे. जबाब देणारे हेच लोक आहेत. सदर प्रकरण सावकारीचे आहे ताब्याचे नाही. फेर फार २००१ व खरेदीखत अर्जदारांनी आव्हानीत केलेले आहे. श्री.एकनाथ हरीभाऊ नरवडे व श्री.नामदेव दादा गवळी यांचा आर.सी.एस. ८/२००८ मधील मा.न्यायालया समोरील उलट तपास पहावा. म्हणुन कलम १०१ इंडियन इव्हिडंन्स ॲक्ट नुसार जो मानुस आरोप करतो त्यांनी तो सिध्द करणे आवश्यक असुन अर्जदाराने शपथेवर पुरावे दिलेले नाहीत. मा.उच्च न्यायालय खंडपिठ, नागपूर निकालानुसार अर्जदाराचे वडीलांचा अर्ज निकाली असून, सदर प्रकरणी अर्जदाराच्या वडीलानी सदर व्यवहारात सक्षम न्यायालयात दाद मागीतली नाही. (नोंदणीकृत खरेदी रद्द करणे बाबत) त्यामुळे सदर अधिकार अर्जदारास नाही. म्हणून कायद्याची मर्यादा पाहावी लागेल. त्याप्रमाणे व्यवहारा नंतर सक्षम न्यायालयात दाद मागितली नाही. सदर खेरदी खतझाले त्यावेळी अर्जदार हे साक्षीदार होते परंतु त्यांनी आक्षेप घेतला नाही व आज पर्यंत अर्जदाराने कोठेही उजर किंवा खरेदीखत पटलवून देणे बाबत म्हणने मांडले नाही. त्यांच्या विरूध्द तक्रार दिलेली नाही.

तसेच अर्जदाराने १३ खरेदीखता बाबत उल्लेख केलेला असून, गैरअर्जदारास मालमत्ता घेण्याचा व विकण्याचा मुलभुत अधिकार नाही. त्यांचा खुलासा त्यांच्या लेखी म्हणण्यात आहे. कलम ११ सीपीसी आणि कलम १० सीपीसी पाहिले असता सदर प्रकरण आर.सी.एस.८/२००८ शी जोडलेले दिसते. सदर बाबी या प्रकरणात मांडलेल्या दिसतात. कलम ११ नुसार एका प्रकारणाचा निकाल लागल्यावर त्याच कार्यालयात त्याच मुद्दयावर परत वाद निर्माण करता येत नाही . कलम १० प्रमाणे दोन न्यायालया समोर प्रकरण चालविता येत नाही. सन २००७ मधील आदेशाचे पालन केलेले नाही. तसेच कलम १० नुसार मनाई हुकमाचा दावा मा.न्यायालया समोर चालू असताना सदर दावा या कोर्टा समोर चालविता येणार नाही. मनाई हुकुम आमच्या बाजूचा नाही या म्हणण्याचा प्रस्तुत दाव्याचा संबंध नाही. अर्जदाराला अर्ज दाखल करण्याचा अधिकार नाही. त्यामुळे सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा. गैरअर्जदार सावकारी करतात, व्याज घेतात व सावकारी व्यवहारातुन खरेदीखत करून घेऊन ते गहाण खत ठेवतात या म्हणण्याला पुष्टर्थ व्याज घेण्याबाबत कोणताही पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे सदर प्रकरण फेटाळण्यात यावे.

त्या उपर अर्जदार व गैरअर्जदार यांचे म्हणन्या बाबत विचारले असता अर्जदाराचे वकील यांनी नमुद केले की, त्यांच्या कायदेशिर अधिकार कक्षे बाबत सांगीतले की, त्यांनी दिलेल्याअर्जा मध्ये वडील मयत असल्यामुळे (श्री.अंबादास गांधीले) त्यांचा वारस (मुलगा) म्हणून अर्ज केलेला आहे. आणि त्यांचा म्हणजेच श्री जनार्धन अंबादास गांधीले,त्यांची आई व भाऊ यांचे विरोधात उपरोक्त नमुद आर.सी.एस. ८/२००८ दावा दाखल केला आहे. त्यामुळे त्यांना अधिकार नाही या म्हणन्यास काहीही अर्थ नाही. तसेच कलम १० सी.पी.सी. हे एक दावा दोन न्यायालया समोर प्रस्तुत प्रकरणी लागू होत नाही. कारण आर.सी.एस.८/२००८ हा दावा मनाई हुकमाचा आहे.आणि प्रस्तुत दावा हा खरेदीखत सावकारीत गहाणखत जाहिर करण्यांचा आहे.सबब सदर बाबत अर्ज करण्याचा अधिकार मयताच्या वारसाला आहे.

उपरोक्त प्रमाणे सुनावणीच्या वेळी प्राप्त झालेले अर्जदार व गैरअर्जदार यांचे म्हणने त्यांच्या वतीने प्राप्त झालेले साक्षीदारांचे जवाब तसेच या बाबतचे लेखीपुरावे,अर्जदार व गैरअर्जदार यांचे अभियोक्ते यांचा लेखी युक्तीवाद, चौकशी अधिकारी यांचा चौकशी अहवाल यावरून सुनावणी अंती पुढील मुद्दे निश्चित करण्यात येत आहेत. सुनावणी अंती निश्चित करण्यात आलेले मुद्दे सुनावणीच्या वेळी प्राप्त झालेले साक्षीदारांचे जवाब पुरावे विचारात घेता त्यावर निम्नस्वाक्षरीत यांचे त्यावर कारणासह निष्कर्ष खालील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | गैरअर्जदार यांचा अवैध सावकारी व्यवसाय आहे काय? असल्यास अर्जदार श्री जनार्धन आंबादास गांधिले यांनी केलेली तक्रार ही अवैध सावकारी प्रकरणात मोडते काय? | होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २. | अर्जदार यांनी दाखल केलेला अर्ज महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ मधील तरतुदीनुसार चालविण्या योग्य आहे काय? | होकारार्थी |
| ३ | अर्जदार यांचे वडील कै.श्री. अंबादास महादु गांधिले रा. लांझी ता. गंगापुर यांनी त्यांची हिरापूर शिवारातील गट न.५५ मधील ८० आर शेतजमिन गैरअर्जदार सावकार श्रीमती पुष्पाबाई तारांचद साबळे रा. शिवराई ता. गंगापुर यांच्या नावावर अवैध सावकारी व्यवहारात रू.३०,०००/- मध्ये प्रतिभुती म्हणुन लिहुन दिली आहे काय? दिली असल्यास सदरची शेतजमिन महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ अन्वये मुळहस्तांतरणकार यांना परत करणे योग्य आहे काय? | होकारार्थी |

## कारणमिमांसा

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD * DIST AURANGABAD *

सुनावणी अंती निश्चित केलेले मुद्दे त्यावर निम्नस्वाक्षरीत यांचे निष्कर्ष होकारार्थी दिलेले आहे. त्या बाबत मुद्दे निहाय कारणमिमांसा पुढील प्रमाणे आहे.

मुद्दा क्रमांक १ गैरअर्जदार यांचा अवैध सावकारी व्यवसाय आहे काय? असल्यास अर्जदार श्री जनार्धन आंबादास गांधिले यांनी केलेली तक्रार ही अवैध सावकारी प्रकरणात मोडते काय? या बाबतचे निष्कर्ष होकारार्थी दिलेले आहे. त्या बाबतची कारणमिमांसा अशी अर्जदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात नमुद केले आहे की, त्यांचे वडील कै.श्री. अंबादास महादु गांधीले यांनी गैरअर्जदार यांच्याकडुन रू. ३००००/- दिढी ५ टक्के या हिशोबाने रक्कम व्याजाने घेतलेली होती. त्या रकमेस धर म्हणुन अर्जदार यांचे वडीलांनी त्यांचे नावावरील मौजे हिरापुर ता. गंगापुर शिवारातील गट नंबर ५५ मधील ८० आर शेतजमिन मुद्दल व व्याजाच्या रकमेची परत फेड झाल्यावर शेतजमिन परत पलटवुन घेण्याच्या तोंडी बोलीवर गैरअर्जदार सावकार यांच्या नवावर लिहुन दिलेली होती. सदरची रक्कम परत केल्यावर ही वादातीत मिळकत त्यांनी परत पलटवुन दिलेली नाही. या अर्जदाराच्या म्हणन्यास या व्यवहारातील तसेच मध्यस्ती साक्षीदार पुष्टी देत आहे. त्या बाबतच्या साक्षीदाराचा तपशील खालील प्रमाणे आहे.

अर्जदार यांनी त्यांच्या खुलाशा सोबत श्री. अर्जुन तुकाराम साबळे यांनी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, गंगापुर यांच्या समक्ष दिनांक ०९/१०/२०१५ रोजी दिलेल्या जवाबाची प्रत सादर केली असुन त्या जवाबात श्री. साबळे यांनी असे नमुद केले आहे की, त्यांनी त्यांच्या भावकीतील गैरअर्जदार श्रीमती पुष्पाबाई ताराचंद साबळे यांना सन २००१ मध्ये आईच्या आजारपणाच्या खर्चासाठी पैशाची मागणी केली असता त्यावेळी गैरअर्जदार यांनी सांगितले की, पैसे देण्यात येईल तथापी जमिनीचे खरेदीखत करून दयावे लागेल त्या वेळी त्यांनी गैरअर्जदार यांच्याकडुन रू.३००००/- ११

महिण्यासाठी दिढी या व्याज पध्दतीने घेतले होते. या बदल्यात त्यांनी त्यांची नारायणपुर शिवारातील गट नंबर ४८ मधील ४० आर जमिनीचे खरेदीखत गैरअर्जदार यांच्या नावाने दिनांक ३०/०४/२००१ रोजी करून दिले होते. या नंतर २ वर्षांनी त्यांनी रू ६००००/- रोख परत केले व शेतजमिन परत करणे बाबत त्यांना विनंती केली परंतु त्यांनी जमिनी परत करण्यास टाळाटाळ केली. त्या वेळी ही जमिनी त्यांच्याच ताब्यात होती. गैरअर्जदार यांची दुसरी जमिन त्यांच्या शेजारीच असल्याने त्यांना विहीरीला पाणी येते त्यामुळे बटाईने म्हणुन वरील शेतजमिन मागितली तेव्हा त्यांना वाटले की, उत्पन्न वाढेल व त्यांच्याकडील रक्कम कर्जात जमा होईल परंतु गैरअर्जदार यांनी त्यांना ऊसाचे पैसे सुध्दा दिले नाही. ते गरीब असल्याने भांडन तंटा करण्यास दुसरे कोणीही नव्हते गैरअर्जदार यांनी गोड बोलुन जमिन त्यांच्या ताब्यातुन घेतली व त्याचा फेर फार व ७/१२ वर नोद करून घेतली ही जमिन आजदेखील गैरअर्जदार यांच्याच ताब्यात आहे. काही दिवसानंतर ते पुन्हा रू.१,००,०००/- देण्यास तयार झाले तथापी गैरअर्जदार यांनी जमिनी परत करण्यास नकार दिला. गैरअर्जदार श्रीमती पुष्पाबाई साबळे हया अवैध सावकारी करतात व व्याजाने पैसे वाटप करून शेतकऱ्यांच्या जमिनी घेत असल्याने त्यांच्या विरूध्द कार्यवाही करावी असा जवाब नोंदविलेला आहे.

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD * DIST. AURANGABAD *

अर्जदार यांनी त्यांच्या म्हणन्यासोबत श्री. रामदास बन्सी साबळे रा. शिवराई यांनी दिनांक ०९/१०/२०१५ रोजी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. गंगापुर यांच्या समोर हजर होऊन शपथपुर्वक लिहुन दिलेल्या जवाबाची प्रत सादर केली असुन त्या जवाबात श्री. साबळे यांनी असे नमुद केले आहे की, त्यानी गैरअर्जदार सावकार यांच्याकडुन मुलीच्या लग्नासाठी सन २००० व २००१ मध्ये दोन टप्यात एकूण रू. ३००००/- सावकारी कर्ज १० टक्के दराने घेतले होते त्या बदल्यात त्यांनी त्यांची मौजे नारायणपुर शिवारातील गट नंबर ४८ मधील २० आर जमिन खरेदीखत दिनांक ०२/०५/२००१ रोजी गैरअर्जदार यांच्या नावाने करून दिले होते. त्यांनी २ ते ३ वर्षात या बद्दल रू. ६००००/- परत केलेले होते. जमिन परत पलटवुन देण्यासाठी सांगितले होंते. तथापी गैरअर्जदार यांनी नकार देऊन जमिनीचा ताबा घेतला व फेर फार नोद त्यांच्या नावाने करून घेतली या बाबत वाद मा. दिवाणी न्यायालय गंगापुर येथे चालु होता. त्या दाव्याचा निकाल मिळाला नाही. त्यांनी सुध्दा पाठपुरावा केला नाही. गैरअर्जदार हे त्यांच्या भावकीतील असुन त्यांच्या जमिनी लगतच गैरअर्जदार यांची जमिनी आहे. त्यांना पैशाची गरज असल्याने फसवणुक करून गैरअर्जदार यांनी त्यांची जमिन घेतली आहे. गैरअर्जदार यांचा सावकारीचा व्यवहार आहे त्यातुन त्यांनी अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या आहे. त्यामुळे त्यांच्या विरूध्द कार्यवाही करून त्यांची जमिन परत मिळावी या साठी जवाब सादर केलेला आहे.

गैरअर्जदार यांनी त्यांचे म्हणन्यासोबत श्री. नामदेव दादा गवळी यांनी दिनांक १९/०९/२०१४ रोजी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था , ता. गंगापुर यांच्या समक्ष दिलेल्या जवाबाची प्रत सादर केली असून त्या जवाबात श्री गवळी यांनी असे नमुद केले आहे की, त्यांनी आर्थीक गरजेपोटी सन १९९९ मध्ये त्यांच्या गावातील सावकार गैरअर्जदार यांच्याकडुन रू. ३००००/- ५ टक्के व्याजाने घेतले होते. त्या बद्दल त्यांनी मौजे नारायणपुर शिवारातील गट नंबर २६

मधील १ एकर २० आर जमिनीचे खरेदीखत दिनांक १५/०४/१९९९ रोजी करून दिले होते. त्यांनी रकमेचे व्याज गैरअर्जदार यांना २ वर्षा पर्यंत दिले तदनंतर मुद्दल रक्कम देणे त्यांना अवघड झाल्याने त्यांनी त्यांची याच गटातील २० आर शेत सन २००१ मध्ये विक्री करून गैरअर्जदार यांची संपुर्ण रक्कम परत केली. त्यांचे वरील नमुद १ एकर २० आर जमिनीचे खरेदीखत दिनांक ०२/०७/२००१ रोजी करून घेतले त्यांनी वरील जमिन सावकारी पोटीच गैरअर्जदार यांनाच लिहुन दिली होती. परंतु त्यांच्याकडे पैसे नसल्याने दुसरी जमिन विक्री करून ही १ एकर २० आर जमिन परत मिळवली आहे. गैरअर्जदार हया सावकारीचा व्यवहार करतात त्यांनी अर्जदार यांची शेतजमिन सावकारी कर्जात घेतली आहे. या बाबत त्यांना माहिती आहे. असा जवाब लिहुन दिलेला आहे.

गैरअर्जदार यांनी त्यांचे म्हणन्यासोबत उपविभागीय अधिकारी वैजापुर यांच्या दिनांक ३०/०५/२०११ च्या निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे. त्यानुसार उपविभागीय अधिकारी वैजापुर यांनी तहसिलदार गंगापुर यांचा निर्णय रद्द केलेला आहे. या आदेशाद्वारे तहसिलदार गंगापुर यांना या प्रकरणी शेतजमिनीवर कोणाचा ताबा आहे याची चौकशी करावी व अर्जदार यांचा ताबा असल्यास त्या बाबतची नोंद वहीतीत अर्जदार यांच्या नावाने करावी असे आदेश दिलेले आहे.

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD
DIST. AURANGABAD

अर्जदार यांनी त्यांच्या म्हणन्यासोबत दिनांक १०/०१/२००८ रोजीचा पंचनामा सादर केला असून त्यात असे नमुद केली आहे की, मा. तहसिलदार गंगापुर यांनी बोलावण्यावरून पंचलोक हजर होऊन पंचनामा करून दिलेला आहे. त्यानुसार गट नंबर ५५ मधील ८० आर शेतजमिनी बाबत ७ ब लावणे बाबतचा पंचानामा असून या ८० आर क्षेत्रात कापूस पिक होते. आता गहु पेरलेले असून सन २००७-२००८ पासुन पेकपेरा जमिनी बाबत अर्जदार यांचा ताबा असून या जमिनीची मेहणत मशागत त्यांनीच केली आहे. असा पंचनामा केलेलाआहे.

या जमिनीच्या ताब्या बाबत शेतजमिनीच्या शेजारील पंच श्री. नानसाहेब विठ्ठल देवकर, श्री. बन्सी काशिनाथ सातपुते, श्री. भिकाजी भानुदास गांधीले व श्री. दिलीव रावसाहेब जगदाळे यांनी तलाठी यांच्याकडे दिनांक १०/०१/२००८ रोजी जवाब सादर केले असून त्यांच्या जवाबानुसार सदरील शेतजमिनीवर अर्जदार यांचाच ताबा असल्या बाबत जवाबात नमुद आहे.

याच जमिनीच्या ताब्या बाबत मा. उपविभागीय अधिकारी वैजापुर यांचा दिनांक ३०/०५/२०११ च्या निर्णयानुसार तहसिल कार्यालयाकडुन चौकशी करण्यात आलेली असून त्या नुसार दिनांक १७/०६/२०११ रोजी ताब्या बाबतचा पंचनामा केलेला आहे. त्यावर मंडळ अधिकारी तथा तलाठी यांच्या सह त्यावर आठ पंचाच्या सहया आहेत. या पंचनाम्यानुसार सदरील गट नंबर ५५ मधील २ एकर शेतजमिन ही पुर्वी पासुन अर्जदार यांच्या ताब्यात असून सन २०११-२०१२ या वर्षी त्या जमिनीमध्ये कापुस पिकाची लागवड केली असल्या बाबत पंचानाम्यात नमुद आहे. या

पंचनाम्यानुसार मंडळ अधिकारी यांनी दिनांक २२/०६/२०११ रोजी तहसिलदार यांना जमिनीचा ताबा हा अर्जदार यांचा असल्या बाबत अहवाल सादर केलेला आहे.

अर्जदार यांनी त्यांच्या म्हणन्यासोबत दावा क्रमांक ८/२००८ मध्ये मा. दिवाणी न्यायालय गंगापुर येथे श्री. एकनाथ हरीभाऊ नरवाडे यांनी न्यायालयात दिलेल्या साक्षीची प्रत सादर केली असून त्यानुसार त्यांचे सर तपासणी प्रतिज्ञापत्रात नमुद आहे की, ते गैरअर्जदार व अर्जदार यांना ओळखतात दावा मिळकत ही पुर्वी पासुन ते आजपर्यंत अर्जदार यांच्या ताब्यात असून गैरअर्जदार हया सावकारीचा व्यवहार करतात अर्जदार यांचे वडील यांनी गैरअर्जदार यांच्याकडुन व्याजाने पैसे घेतले होते. त्या पैशाला धर म्हणुन वादातील मिळकत दस्त करून दिली होती. या व्यवहार वर साक्षीदार म्हणुन त्यांनी सही केलेली आहे. सावकारीचा व्यवहार हा दिढीचा होता जमिन अर्जदार यांच्याच ताब्यात राहील असे ठरलेले होते अर्जदार यांनी गैरअर्जदार यांना व्याजासह पैसे त्याच्या समक्ष परत केलेले आहे हा व्यवहार त्यांच्या समक्ष झालेला आहे. असे असतांना सुध्दा जमिनीचा दस्त गैरअर्जदार यांनी उलटुन दिलेला नाही. दावा मिळकतीवर अर्जदार यांचे वडीलांचा ताबा होता त्यांचे मृत्युनंतर या जमिनीवर अर्जदार यांचा ताबा आहे. त्यावर ते पिक घेत आहे. याचा उलटतपास गैरअर्जदार यांचे वकील यांनी घेतलेला होता. त्या उलट तपासातही त्यांनी सदर व्यवहार हा सावकारीचा असून वादातीत मिळकतीवर अर्जदार यांचाच ताबा असल्याचे त्यांनी सांगितलेले आहे.

अर्जदार यांनी त्यांच्या म्हणन्यासोबत मा.दिवाणी न्यायालय गंगापुर येथे दावा क्रमांक ८/२००८ मध्ये तलाठी श्री. संतोष पिता अनंत धर्माधिकारी यांचे सरतपासणी प्रतिज्ञापत्र सादर केले असून त्या प्रतिज्ञापत्रानुसार तलाठी श्री. संतोष पिता अनंत धर्माधिकारी यांनी न्यायालयात असे नमुद केले आहे की, त्यांनी दिनांक १०/०१/२००८ रोजी केलेला वादग्रस्त जमिनीचा पंचनामा खरा आहे. उलट तपासातही ही बाबत त्यांनी मान्य केलेली आहे.

अर्जदार यांनी त्यांच्या म्हणन्यासोबत मा.दिवाणी न्यायालय गंगापुर येथे दावा क्रमांक ८/२००८ मध्ये श्री. बन्सी काशिनाथ सातपुते यांचे सरतपासणी प्रतिज्ञापत्र सादर केले असून त्या प्रतिज्ञापत्रानुसार श्री. बन्सी काशिनाथ सातपुते यांनी न्यायालयात असे नमुद केले आहे की, वादातील मिळकती शेजारीच त्यांची शेतजमिन असून वादातीत मिळकतीवर अर्जदार यांचा ताबा असून गैरअर्जदार यांना या शेतजमिनीत त्यांनी कधीही पाहीलेले नाही. ही बाब त्यांनी उलट तपासातही मान्य केलेली आहे.

अर्जदार यांनी त्यांच्या म्हणन्यासोबत मा.दिवाणी न्यायालय गंगापुर येथे दावा क्रमांक ८/२००८ मध्ये श्री दिलीप रावसाहेब जगदाळे यांचे सरतपासणी प्रतिज्ञापत्र सादर केले असून त्या प्रतिज्ञापत्रानुसार श्री. दिलीप रावसाहेब जगदाळे यांनी न्यायालयात असे नमुद केले आहे की, ते अर्जदार व गैरअर्जदार यांना ओळखतात त्यांची मौजे हिरापुर ता. गंगापुर येथे गट नंबर ५५ मध्ये शेतजमिन आहे. या जमिनी शेजारी त्यांची जमिन आहे. ती त्यांनी १ वर्षापुर्वी विक्री केलेली आहे. गट नंबर ५५ मधील शेतजमिन अर्जदार हे स्वता: कसतात या मध्ये गैरअर्जदार यांना त्यांनी कधीही पाहीलेले नाही. या

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD DIST. AURANGABAD

शेतजमिनीमध्ये अर्जदार यांनी खाम नदीवरून पिव्हीसी पाईप लाईन द्वारे पाणी आणले असून ते शेतात बागाईती पिके घेतात. या बाबत उलट तपासात ही सदर बाब त्यांनी मान्य केलेली आहे.

अर्जदार यांनी त्यांचे म्हणन्यासोबत मा.दिवाणी न्यायालय गंगापुर येथे दावा क्रमांक ८/२००८ मध्ये श्री. नामदेव पिता दादा गवळी यांचे सरतपासणी प्रतिज्ञापत्र सादर केले असून त्या प्रतिज्ञापत्रानुसार श्री. नामदेव पिता दादा गवळी यांनी न्यायालयात असे नमुद केले आहे की, त्यांनी गैरअर्जदार हे सावकारी करीत असल्याने त्यांनी सन १९९९ मध्ये यांच्याकडुन व्याजाने पैसे घेतले होते. त्यावेळ त्यांच्या मालकीची गट नंबर २६ मधील १ एकर २० आर शेतजमिनीचा खरेदीचा कागद त्यांच्याकडुन लिहुन घेतला होता त्यानंतर त्यांनी संपुर्ण रक्कम व्याजासहीत परत केल्यावर पैसे घेतावेळेस जो जमिनीचा कागद करून दिला होता. तो परत त्यांच्या हक्कात करून घेतला आहे. गैरअर्जदार हया त्यांनी जसा कागद करून दिला होता तसाच कागद इतरांकडुन पैसे देतांना करून घेतात असे प्रतिज्ञापत्र करून दिलेले आहे. उलट तपासातही ही बाब त्यांनी सांगितलेली आहे.

अर्जदार यांचे तक्रार अर्जानुसार या प्रकरणी श्री. बी.एम.नवथर, सहकार अधिकारी, श्रेणी-१, गंगापुर यांनी चौकशी केलेली असुन त्या चौकशी अहवालात त्यांनी असे नमुद केले आहे की, अर्जदार यांचे तक्रार अर्जाच्या अनुषंगाने गैरअर्जदार श्रीमती पुष्पाबाई ताराचंद साबळे रा. शिवराई ता. गंगापुर यांचे राहते घरी दि. ०९.०९.२०१५ रोजीच्या झडती कार्यवाही अंतर्गत महाराष्ट्र सावकारी (नियमन) अध्यादेश २०१४ मधील कलम १६ अंतर्गत संबंधितांना नोटीस देण्यात आली . तद्नंतर घराची झडती बाबतची कार्यवाही ठिक सकाळी ०८.४५ ते ठिक ११.०० या दरम्यान पुर्ण करण्यात येवुन सविस्तर घर झडती पंचनामा करण्यात आलेला आहे.झडती कार्यवाही दरम्यान एकुण अनुक्रमे ०१ ते ४० यादीप्रमाणे ( एकुन ७ /१२ - २१ पाने , एकुण खरेदीखत संख्या ९९ पाने , ०८ पास बुक व ०१ चेक बुक तसेच ०१ मुदत ठेव प्रमाणपत्र इ. ) कागदपत्रे हस्तगत केलेली आहेत. श्रीमती पुष्पाबाई ताराचंद साबळे रा. शिवराई ता. गंगापुर यांचे राहते घराची प्रत्यक्ष झडती मध्ये **१)** ग. नं. ४८ ७ / १२ - ०६ पाने , ग. नं. ५५ ७ / १२ - ११ पाने , ग. नं. ८१ ७ / १२ - ०१ पाने , ग. नं. ११२ ७ / १२ - ०३ पाने **०२)** एकुन ०८ पासबुक व ०१ चेकबुक **०३)** एकुन ०९ खरेदी खत नक्कल **०४)** ०१ मुदत ठेव प्रमाणपत्र **०५)** करारनामा इत्यादी कागदपत्र ची प्रत मिळालेली आहेत. प्रस्तुत प्रकरणी संपुर्ण घराची झडती अर्जदार श्री. जनार्धन अंबादास गांधीले रा. लांझी ता. गंगापुर यांचे समक्ष करून पंचनामा करण्यात आलेला आहे.

उपरोक्त झडती कार्यवाही अंतर्गत हस्तगत केलेली कागदपत्रे व तक्रारदारानी सादर केलेले कागदपत्रे व त्यांचे कार्यालयातील उपलब्ध कागदपत्रे अनुसरुन प्राधिकृत अधिकारी म्हणून दि. १६.०९.२०१५ रोजी सदर अर्जातील नमुद ग.नं. ५५ मधील २ एकर जमिन क्षेत्राचा प्रत्यक्ष ताबा , चतु;सिमा प्रमाणे लगतचे चार ही खातेदार / शेतकरी , अर्जातील / खरेदीखता वरील नमुद साक्षीदार इ. यांचे समक्ष पंचनामा करुन प्रत्यक्ष जबाब घेण्यांत आले असुन सदर शेतजमीनीस प्रत्यक्ष भेट देऊन दि. १६.०९.२०१५ रोजीचा पंचनामा करण्यांत आलेला आहे. अर्जातील नमुद क्षेत्राचा प्रत्यक्ष ताबा ,

लगतचे चार (४) ही शेतकरी / खातेदार यांनी उक्त जमिनीचा ताबा अर्जदार श्री जनार्दन अंबादास गांधीले यांचा असुन श्रीमती पुष्पाबाई ताराचंद साबळे रा. शिवराई ता. गंगापुर यांना उक्त क्षेत्रात / जमिनीत बघीतलेले नाही. तसेच सदर खरेदी खतावरील साक्षीदार श्री एकनाथ हरीभाउ नरवडे / उत्तम अंबादास गांधीले यांनी प्रत्यक्ष जबाब दिला की , सदर व्यवहार हा कर्ज देवाण - घेवाण व्यवहारातुन झालेला असुन उक्त व्यवहारास तारण म्हणुन फक्त खरेदीखत करुन देण्यांत आले. तसेच सदर व्यवहारातील रु ३०००० /- व्याजासहीत परत केलेनंतर खरेदीखत परत करण्यांचे ठरलेले होते व त्याचे आम्ही साक्षीदार आहोत, असे स्पष्टपणे म्हणने मांडलेले आहे . तसेच मा.उपविभागीय अधिकारी वैजापुर (महसुल ) यांचे आदेश दि. ३०.०५.२०११ , मा. तहसिल कार्यालय गंगापुर यांचा पंचनामा दि.१०.०१.२००८, मा.मंडळ अधिकारी शेंदूरवादा / वाळुज यांचा प्रत्यक्ष ताबा स्थळ पंचनामा दि. १७.०६.२०११ तसेच प्राधिकृत तपासणी अधिकारी म्हणून निश्चित केलेल्या दि. १६.०९.२०१५ रोजीच्या स्थळ पंचनामानुसार खरेदी खत करून दिलेपासून आज अखेर सदर मौजे हिरापूर ता.गंगापूर शेती गट नं. ५५ मधील अर्जातील नमुद ०२ एकर जमीन अर्जदार श्री जनार्धन अंबादास गांधीले यांचेच ताब्यात असल्याचे निदर्शनास येते. अर्जासोबत सलग्न केलल्या खरेदी खताच्या नकला पाहता श्री नामदेव दादा गवळी यांची गट नं. २६ मधील एकून क्षेत्रापैकी ०.६० आर जमीन दिनांक ०२.०४.१९९९ रोजी श्रीमती पुष्पाबाई ताराचंद साबळे यांना सावकारी व्यवसायात तात्पुरते खरेदी खत करून दिले व सदर व्यवहारातील रक्कमेचे व्याज देवून मुददल रक्कमे बाबत ग. नं. २६ मधील ०.२० आर जमीन सन २००१ मध्ये कायम विक्री करून उर्वरीत क्षेत्राची दिनांक ०२.०७.२००१ रोजी ०.४० आर जमीनीचे (पलटी )परत खरेदी खत करून घेतले व तसा जबाब समक्ष श्री नामदेव दादा गवळी यांनी सादर केलेला आहे. दिनांक ०९.०९.२०१५ रोजीच्या घर झडती कार्यवाही मध्ये श्रीमती पुष्पाबाई ताराचंद साबळे रा. शिवराई यांचे मिळालेली बँक पासबुके , त्यामधील नोंदी उदा. अजिंठा अर्बन को. ऑफ. बँक म. औरंगाबाद या बँकेचे गैरअर्जदार यांचे पासबुकातील नोंदी दि. ०२.११.२००७ (२.६७ लक्ष) नावे /जमानोंद , दिनांक १६.०५.२००७ जमा नोंद , दिनांक १०.०६.२००९ नावे नोंद , दिनांक २३.०६.२००९ , २५.०६.२००९ नावे नोंदी , दिनांक ३०.०७.२००९ जमा / नावे नोंद, दिनांक १०.१२.२००९ नावे नोंद इत्यादी तसेच जि. म. स. बँक म. शाखा वाळुज येथील बँक खाते क्र. १२५२२ मधील दिनांक ०३.०५.२००२ व त्या पुर्वीच्या बँक खातेवरील नोंदी , महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा वाळुज येथील बँक खाते क्र. ८०००३८७४१३ वरील दिनांक २३.०६.२०१५ रोजी जमा / नावे नोंद या वरुन अर्थिक व्यवहार निदर्शणास येतात . तसेच झडती कार्यवाही अंतर्गत हस्तगत कागदपत्रामध्ये महाराष्ट्र ग्रामिण बँक शाखा वाळुज मुदत ठेव रक्कम रुपये १०,०००००/-पावती क्रं १३६९६९ ( छायांकित प्रत ) दिनांक २८.०३.२०१३ या बाबत विचारणा केली असता समाधानकारक उत्तर दिलेले नाही. यावरून प्राधिकृत अधिकारी तथा चौकशी अधिकारी यांचे दिनांक २३.०९.२०१५ अहवालात निष्कर्षात नमुद केले आहे की, गैरअर्जदार यांची घेतलेली घर झडती व तहसिल कार्यालयाचे कागदपत्रे , त्यानुसार प्राधीकृत अधिकारी म्हणुन केलेला प्रत्यक्ष स्थळ पंचनामा,उक्त क्षेत्राचे लगतचे

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD

शेतकरी/ खातेदार , तक्रार अर्जातील नमुद क्षेत्राच्या खरेदीखतावरील साक्षीदार यांचे जबाब , झडती कार्यवाहीत मिळालेली एकुन ०९ खरेदी खत प्रती , मुदत ठेव प्रमाणपत्र, बॅंक पास बुकातील नोंदी प्रस्तुत व्यवहार सन २००० (दिनांक ३१.१०.२००० ) मध्ये होवुनही प्रत्यक्ष शेताचा ताबा , ७ ब नोंद इ. अर्जदार श्री जनार्धन अंबादास गांधीले रा. लांझी ता. गंगापुर यांचा असल्याने अर्जातील नमुद प्रमाणे उक्त व्यवहार हा सावकारी व्यवसायातुन झालेला असल्याचे निदर्शणास येते, असे स्पष्ट मत व्यक्त केले आहे.

उपरोक्त चौकशी अहवाल, अर्जदार यांच्या वतीचे साक्षीदार व पुरावे पाहता गैरअर्जदार यांचा अवैध सावकारी व्यवसाय असल्याचे सिध्द होते. या सावकारी व्यवसायामध्ये त्यांनी श्री. नामदेव दादा गवळी यांची शिवराई शिवारातील गट नंबर २६ मधील १ एकर २० आर शेतजमिन सावकारी व्यवसायात पैशास धर म्हणुन लिहुन घेऊन ती शेतजमिन मुद्दल व व्याजाची परत फेड झाल्यावर परत पलटवुन दिलेली आहे. अर्जदार यांचे बाजुचे साक्षीदार यांचे प्रतिज्ञापत्र पाहता अर्जदार यांनी त्यांची मौजे हिरापुर शिवारातील गट नंबर ५५ मधील ८० आर शेतजमिन सावकारी व्यवहारात पैशास धर म्हणुन लिहुन दिलेली आहे. तसेच कर्जाऊ रक्कम घेतावेळी ठरल्या प्रमाणे आजही सदरहु शेतजमिनीचा ताबा अर्जदार यांचे ताब्यात आहे. ही बाब चौकशी अधिकारी व मंडळ अधिकारी यांनी केलेल्या पंचनाम्या नुसार दिसुन येत आहे. त्यामुळे गैरअर्जदार यांचा सावकारी व्यवसाय असल्या बाबत सिध्द होत आहे. तसेच अर्जदार यांनी त्यांची शेतजमिन सावकारी व्यवसायात पैशास धर म्हणुन लिहुन दिलेली असल्याने त्यांची तक्रार अवैध सावकारी अंतर्गत असल्याचे सिध्द होत आहे. तसेच गैरअर्जदार सावकार श्रीमती पुष्पाबाई ताराचंद साबळे यांनी श्री. नामदेव दादा गवळी यांची गट नंबर २६ मधील ८० आर शेतजमिन दिनांक १५/०४/१९९९ रोजी सावकारी व्यवहारात खरेदीखता द्वारे गहाण म्हणुन ठेवली होती. ती शेतजमिन त्यांनी मुद्दल व व्याजाची परत फेडी नंतर दिनांक २१/०७/२००१ रोजी त्यांनिच पुन्हा पलटवुन दिलेली आहे. ही बाब इतर साक्षीदार यांचे जवाब पहाता गैरअर्जदार यांचा म्हणुन मुद्द क्रमांक १ चे उत्तर होकारार्थी दिलेले आहे.

मुद्दा क्रमांक २ नुसार अर्जदार यांनी दाखल केलेला अर्ज महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ मधील तरतुदीनुसार चालविण्या योग्य आहे काय? या बाबतचे उत्तर होकारार्थी दिलेले आहे. त्या बाबतचे कारणमिमांसा खालील प्रमाणे गैरअर्जदार यांनी त्यांच्या म्हणन्यासोबत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. गंगापुर यांनी दिनांक २३ नोव्हेंबर २००७ रोजी दिलेल्या निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे. त्या निर्णयानुसार सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. गंगापुर यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपुर यांचे कडील याचीका क्रमांक २३४५/२००६ व इतर याचीकेमध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे दुय्यम निबंधक यांचे कार्यालयात रितसर खरेदीखत करून दिलेल्या मालमत्तेमध्ये हस्तक्षेप करण्याचे अधिकार त्यांना नाही. त्यामुळे या बाबत सक्षम न्यायालयात दादा मागणे बाबत कळवुन अर्जदार यांनी या पुर्व केलेली तक्रार निकाली काढलेली आहे. या बाबात

स्पष्टीकरण देण्यात येत की, महाराष्ट्र राज्य सहकारी पतपुरवठयात देशात आघाडीवर असून या संरचनेव्दारे शेतक-यांची आर्थिक गरज भागविण्यात येते.तरी देखील काही अपरिहार्य कारणास्तव काही शेतकरी /शेतमजूरांना सावकाराकडुन कर्ज घेण्याची गरज भासते,अशा परिस्थतीत सावकाराकडुन शेतक-यांची पिवळणूक होऊ नये म्हणुन राज्यात सावकारी व्यवसायाचे मुंबई सावकारी अधिनियम १९४६ नुसार नियमन करण्यात येत होते.मात्र या कायद्यातील तरतुदी पुरेशा व प्रभावी ठरत नसल्यामुळे सावकाराकडुन शेतक-यांची होणारी पिवळणुक नियंत्रित करणे अडचणीचे होत होते.सावकाराने अवैधरित्या कर्जदार शेतक-यांची मालमत्ता हडप करणे,कर्जावर अवास्तव दराने व्याज आकारले जाणे यावर पुरेसे निर्बध आणता येत नव्हते.सावकारीतील गैरप्रकार उघडकिस आल्यास या अपराधापोटी लावली जाणारी शिक्षा अथवा दंड याबाबतची तरतुद सावकारांवर जरब बसण्यइतपत पुरेशी नव्हती, आणि सावकारी खाली गहाण असलेली जमिन परत करण्याची सदर कायद्यात तरतुद नव्हती म्हणजेच जूना मुंबई सावकारी कायदा हा अपूरा पडू लागला.परिणामी, सावकारीवरील विद्यमान अधिनियम हा,कर्जदार शेतक-यांचे सरंक्षण करण्यास आणि सावकाराकडुन होणा-या पिळवणुकीस प्रतिबंध करण्यास अपर्याप्त असल्याचे दिसुन आले होते,अशा परिस्थितीत,सावकारांकडुन होणा-या कर्जदार शेतक-यांच्या पिळवणुकीस प्रभावी रीतीने प्रतिबंध करण्यासाठी समुचीत व कठोर समाजीक आणि कायदेशिर उपाययोजना करणे शासनास अत्यावश्यक झाले होते.त्यामूळे कडक निर्बध असलेल्या आणि शेतक-यांची सावकाराकडील जमिन परत करणेस सक्षम सुधारीत असा कायदा महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ हा नविन सुधारीत कायदा दिनांक १६.१.२०१४ पासुन राज्यात लागु करण्यात आला.

REGISTRAR OF MONEY LENDERS DIST. AURANGABAD

सदर कायद्याचा प्रचार प्रसाराकरीता शासनाच्या दिनांक २० जानेवारी २०१४ सुचना नुसार २६ जानेवारी २०१४ या राष्ट्रीय दिनांचे औचित्य साधुन ग्रामपंचायतीच्या स्तरावर होणा-या ग्रामसभेमध्ये सहकार विभागामार्फत तयार करण्यात आलेल्या पुस्तीकेचे ग्रामसेवक,तलाठी,सहकार विभागातील क्षेत्रिय अधिकारी यांच्यामार्फत वाचन करण्यात येऊन सदर नविन कायद्याची मोठया प्रमाणात प्रसिध्दी देऊन व्यापक जनजागृती,करण्यात आली.

महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८(१) मधील तरतुदी नुसार कलम १६ खालील पडताळणीच्या दरम्यान किंवा कलम १७ खालील तपासणीच्या दरम्यान निदर्शनास आलेल्या वस्तुस्थितीच्या आधारे किंवा कर्जदाराचे अर्जा वरून अन्य रितीने जर ह्या पडताळणीच्या किंवा तपासणीच्या दिनांका पासून अथवा कर्जदाराचा अर्ज मिळाल्याच्या दिनांका पासून १५ वर्षाच्या आत विक्री, गहाण, भाडेपट्टा विनियमन या रुपाने किंवा अन्य रुपाने सावकाराच्या कब्जात येणे अभिप्रेत असलेली कोणतीही स्थावर मालमत्ता ही सावकारीच्या ओघात सावकाराने दिलेल्या कर्जा बद्दल सावकाराला प्रतिभूती म्हणून दिलेल्या मालमत्तेच्या स्वरुपाचे आहे. असे जिल्हा निबंधकास सहकारण वाटत असेल तर त्या जिल्हा निबंधकास स्वतः किंवा त्या प्रयोजनासाठी विहित रितीने नियुक्त करण्यांत येईल. अशा चौकशी

अधिकाऱ्या मार्फत या व्यवहाराच्या स्वरुपाची आणखी चौकशी करण्यात येईल अशी तरतुद उक्त अधिनियमात करण्यांत आलेली आहे. आणि उक्त अधिनियमातील तरतुदी नुसार अर्जदार यांचे प्रकरणात सुनावणी / चौकशी सुरु करण्यांत आलेली आहे. म्हणुन सदरहु तक्रार महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ कलम १८ मधील तरतुदीनुसार चालविण्या साठी योग्य असल्याने मुद्द क्रमांक २ चे उत्तर होकारार्थी दिलेले आहे.

मुद्या क्र.०१ व ०२ चे उत्तर होकारार्थी असल्याने मुद्या क्र.०३ चे उत्तर होकारार्थी येत असुन अर्जदार यांचे वडील नामे कै.श्री. आंबादास महादु गांधीले यांनी त्यांची मौजे हिरापुर शिवारातील गट नं.५५ मधील ८० आर शेतजमिनीचे खरेदीखत जे गैरअर्जदार सावकार श्रीमती पुष्पाबाई ताराचंद साबळे यांच्या नावाने सावकारीच्या ओघात गहाण खत म्हणुन कर्जाऊ घेतलेल्या रू. ३००००/- रकमेस प्रतिभुती म्हणुन खरेदीखत क्रमांक ३६५१/२००० दिनांक ३१/१०/२००० नुसार लिहुन दिलेले आहे. अर्जदार श्री. जनार्धन आंबादास गांधीले व त्यांचे वडील नामे कै.श्री. आंबादास महादु गांधीले यांनी गैरअर्जदार सावकार श्रीमती पुष्पाबाई ताराचंद साबळे यांची पुर्ण रक्कम व्याजासह परत फेड केल्यावर ही त्यांनी सदरहु जमिन अर्जदार यांना परत पलटवुन दिलेली नाही.त्यामुळे अर्जदार हे हया जमिनीचे वारस असल्याने ही शेतजमिन त्यांना परत पलटवुन देणे योग्य आहे. म्हणुन मुद्दा क्रमांक ३ चे उत्तर होकारार्थी दिलेले आहे.

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD ★ DIST. AURANGABAD ★

गैरअर्जदार श्रीमती पुष्पाबाई ताराचंद साबळे यांनी त्यांचे पृष्टर्थ खालील पुरावे व साक्षीदाराचे शपथपत्रे सादर केलेली आहे.

गैरअर्जदार यांनी त्यांचे खुलाशा सोबत श्री नामदेव दादा गवळी यांनी दिनांक २०/१०/२००७ रोजी रू. १० च्या प्रतिज्ञापत्रावर दिलेल्या जवाबाची प्रत सादर केली आहे. त्या जवाबात श्री. नामदेव दादा गवळी यांनी असे नमुद केले आहे की, ते गैरअर्जदार यांना ओळखतात त्यांनी गैरअर्जदार यांना त्यांची मालकीची नारायणपुर ता. गंगापुर येथील गट नंबर २६ मधील १ एकर २० आर शेतजमिन खरेदीखता आधारे कायम स्वरूपी विक्री केली होती या व्यवहारात कोणताही सावकारी व्यवहार नव्हता सदरील शेतजमिनी गैरअर्जदार यांनी दुसऱ्यास विकली आहे त्यांची गैरअर्जदार बाबत कुठलिही तक्रार नाही. गैरअर्जदार हया कुठल्याही व्याजाचा किंवा पैशाचा सावकारी व्यवहार करीत नाही.

गैरअर्जदार यांनी त्यांचे खुलाशा सोबत श्री हरीशचंद्र पिता एकनाथ भवार यांनी दिनांक १६/१०/२००७ रोजी रू. १० च्या प्रतिज्ञापत्रावर दिलेल्या जवाबाची प्रत सादर केली आहे. त्या जवाबात श्री. हरीशचंद्र पिता एकनाथ भवार यांनी असे नमुद केले आहे की, ते गैरअर्जदार यांना ओळखतात त्यांनी गैरअर्जदार यांना त्यांची मालकीची मौजे लांझी ता. गंगापुर येथील गट नंबर४५मधील १ एकर शेतजमिन खरेदीखता आधारे कायम स्वरूपी विक्री केली होती या व्यवहारात कोणताही सावकारी व्यवहार नव्हता सदरील शेतजमिनी गैरअर्जदार यांनी विक्री काढल्यामुळे ही शेतजमिन त्यांनी खरेदी

केलेली [illegible] [illegible] [illegible]दार बाबत कुठलिही तक्रार नाही. गैरअर्जदार हया कुठल्याही व्याजाचा किंवा पैशाचा सावक[illegible] [illegible] [illegible] न[illegible].

[illegible] [illegible] त्यांच्या खुलाशा सोबत दिनांक १०/०३/२००८ रोजी मा. तहसिलदार यांनी दिलेल्या न्याय नि[illegible] [illegible] [illegible] केलेली आहे. त्या न्याय निर्णयानुसार मा. तहसिलदार यांनी गट नंबर ५५ या जमिनी बाबत तलाठी [illegible] [illegible] [illegible] ७ ब प्रकरण निकाली काढलेले आहे. जमिनीचे ताब्या बाबत दिवाणी न्यायालय गंगापुर येथे दाद [illegible] [illegible] आदेशात नमुद केलेले आहे. या बाबत पुष्टी देता येत नाही कारण गैरअर्जदार यांचे वतीचे साक्षीदार श्री. [illegible] दादा गवळी यांनी दिवाणी दावा क्रमांक ८/२००८ मध्ये व सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. गंगापुर यांच्या [illegible] दिनांक १९/०९/२०१४ रोजी हजर होऊन जवाब सादर केलेले आहे. त्यामध्ये त्यांनी केलेला व्यवहार हा सावकारी अंतर्गत असल्याचे त्यांनी नमुद केलेले आहे. तसेच हरीशचंद्र पिता एकनाथ भवार हे मध्यस्ती साक्षीदार नाही त्यामुळे दोन्ही साक्षदाराचे जवाब हे विचारात घेण्या योग्य नाही. मा. तहसिलदार यांनी दिनांक १०/०३/२००८ रोजी ७ ब बाबतचे प्रकरण निकाली काढलेले आहे. हा निर्णय मा. उपविभागीय अधिकारी वैजापुर यांनी दिनांक ३०/०५/२०११ च्या आदेशानुसार रद्द केलेला असून जमिनीचे ताब्या बाबत चौकशी होऊन निर्णय घेणे बाबत आदेशीत केलेले आहे. त्यानुसार चौकशी होऊन अर्जदार यांच्या शेतजमिनीचा ताबा हा त्याच्याकडेच असल्या बाबत तहसिल कार्यालयाने दिनांक १७/०६/२०११ पंचनामा केला असून मंडळ अधिकारी यांनी त्या बाबतचा अहवाल तहसिलदार यांना दिनांक २२/०६/२०११ रोजी सादर केलेला आहे. त्यामुळे गैरअर्जदार यांनी सादर केलेले पुरावे, म्हणने, साक्षीदारांचे जवाब विचारात घेता येत नाही.

उपरोक्त सुनावणी अंतीचे निष्कर्ष पाहता अर्जदार यांचे वडील नामे कै.श्री. आंबादास महादु गांधीले यांनी त्यांची मौजे हिरापुर शिवारातील गट नंबर ५५ मधील ८० आर शेतजमिन ही रू.३००००/- मध्ये दिढी ५टक्के व्याजदराने मुद्दल व व्याजाच्या परत फेडीनंतर परत पलटवुन देण्याच्या तोंडी बोलीवर खरेदीखता द्वारे गैरअर्जदार श्रीमती पुष्पाबाई ताराचंद साबळे रा. शिवराई ता. गंगापुर जि. औरंगाबाद यांचे नावाने सावकारी व्यवहारात खरेदीखत क्रमांक ३६५१/२००० दिनांक ३१/१०/२००० नुसार प्रतिभुती म्हणुन लिहुन दिलेली आहे व सदरची शेतजमिन गैरअर्जदार श्रीमती पुष्पाबाई तारांचद साबळे यांनी त्यांच्या नावाने अवैध सावकारी व्यवसायात गहाणखत म्हणुन घेतली असल्याची माझी खात्री झालेली आहे. सबब सदरचे खरेदीखत सावकारीत गहाणखत असल्याचे सिध्द झालेले असल्याने सदरचे खरेदीखत अवैध असल्याचे घोषीत करून रद्द करणे व शेतजमिन अर्जदार मुळमालक हस्तांतरणकरणारे मयत श्री. अंबादास महादु गांधीले यांचे कायदेशीर वारस श्री. जनार्धन आंबादास गांधीले यांना परत करणे आवश्यक असल्या बाबतची माझी खात्री झालेली असल्याने त्या बाबत खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

मी.एन.व्ही.आघाव, सावकाराचे जिल्हा निबंधक, तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद महाराष्ट्र सावकारी (नियमन)अधिनियम २०१४ चे कलम १८ (२) नुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून अर्जदार यांचे वडील मयत श्री. अंबादास महादु गांधीले यांनी गैरअर्जदार सावकार श्रीमती पुष्पाबाई ताराचंद साबळे यांना अवैध सावकारीच्या ओघात त्यांचे नावावर असलेली मौजे हिरापुर ता. गंगापुर शिवारातील गट नंबर ५५ मधील ८० आर शेतजमिन खरेदी खत क्रमांक ३६५१ दिनांक ३१/१०/२००० अन्वये सावकार श्रीमती पुष्पाबाई ताराचंद साबळे यांचे नावाने सावकारीच्या ओघात प्रतिभुती म्हणुन खरेदीखता द्वारे लिहुन दिलेली असल्याने सदर शेतजमिनीचे खरेदीखत क्रमांक ३६५१ दिनांक ३१/१०/२००० हे सावकारी अंतर्गत गहाणखत असल्याने ते अवैध असल्याचे घोषीत करून रद्द करण्यात येत आहे. आणि सदर खरेदीखता मधील शेतजमिन ही महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ च कलम १८(२) अन्वये अभिहस्तांतरण कारणारे मुळमालक मयत श्री. आंबादास महादु गांधीले यांचे कायदेशीर वारस श्री जनार्धन आंबादास गांधीले रा. लांझी ता. गंगापुर जि. औरंगाबाद यांना परत करण्यात येत आहे.

महाराष्ट्र सावकारी (नियमन)अधिनियम २०१४ चे कलम १८ (६) नुसार संबंधीत सक्षम अधिकारी यांनी या आदेशाच्या अंमलबजावणी अंतर्गत सदर जमिनीचा तसा फेरफार करावा.

सदर आदेश आज दिनांक ०७/०४/२०१६ रोजी माझी सही व कार्यालयाच्या मुद्रेसह पारीत केला आहे.

**(एन.व्ही.आघाव)**
सावकाराचे जिल्हा निबंधक,
तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, औरंगाबाद

**प्रत :-**

१. मा. उपविभागीय अधिकारी, वैजापुर यांना पुढील कार्यवाहीस्तव माहितीस्तव.
२. मा. तहसिलदार, गंगापूर यांना पुढील कार्यवाहीस्तव देण्यात येत आहे.
३. तलाठी सजा, लांझी ता.गंगापूर यांना देऊन कळविण्यात येते की,उक्त प्रकरणात योग्य ती कार्यवाही करावी.
४. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता.गंगापूर यांना त्यांचा चौकशी अहवाल दिनांक ११.१.२०१६ चे संदर्भात

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे.
२. मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद.

सावकाराचे जिल्हा निबंधक,
तथा जिल्हा उपनिबंधक,